रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २३८
www.ramprahar.com

शनिवार, १६ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


खून करून पळालेल्या आरोपीस अटक/२

उरण तालुक्याचा डोंगरी विकास योजनेत समावेश/३

आयुष्मान भारत योजना नोंदणीकरण, कार्डवाटप/५


## आज जाहीर होणार लोकसभा निवडणूक




**नवी दिल्ली** : केंद्रीय निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम शनिवारी (दि.१६) जाहीर केला जाणार आहे. निवडणूक घोषित होताच संपूर्ण देशात आदर्श आचारसंहिताही लागू होईल. या वेळी किती टप्प्यांमध्ये निवडणूक होणार आणि काय नवे नियम असणार याकडे नागरिकांचे देशाचे लक्ष लागले आहे. गेल्या वेळी २०१९मध्ये लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची तारीख १० मार्च रोजी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर ११ एप्रिल ते १९ मेदरम्यान टप्प्याटप्प्याने मतदान झाले, तर २३ मे रोजी मतमोजणी होऊन निकाल लागला होता. गेल्या वेळी ६७.१ टक्के मतदान झाले होते. या वेळी लोकसभा निवडणुकीत सुमारे ९७ कोटी लोक मतदान करणार आहेत.

# नवी मुंबईतील सिडकोचे प्रकल्प गेम चेंजर




## मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; पाच हजार कोटींच्या प्रकल्पांचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईमध्ये सिडकोच्या माध्यमातून उभे राहत असलेले मेट्रो, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प गेम चेंजर ठरणार आहेत. याचबरोबर देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीपैकी महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीमध्ये मुंबई महानगर प्रदेश परिसरात विविध आंतरराष्ट्रीय प्रकल्प साकारत अन्य महामंडळांसोबतच सिडकोने मोठे योगदान दिले आहे. याचाच परिपाक म्हणजे महाराष्ट्र हे देशाच्या इकॉनॉमीचे ग्रोथ सेंटर सिद्ध झाले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि.१५) केले.

मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जोडणारा पूल, खारघर-तुर्भे जोडमार्ग, लोकनेते दि.बा. पाटील भूमिपुत्र भवन, उलवे किनारी मार्ग आणि प्रवासी जलवाहतूक टर्मिनस नेरूळ या सिडकोच्या सुमारे पाच हजार कोटी किमतीच्या प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास ठाण्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई, आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदा म्हात्रे, आमदार महेश बालदी, आमदार रमेश पाटील, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, डॉ. कैलास शिंदे, दिलीप ढोले यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी नवी मुंबईमध्ये सिडकोच्या माध्यमातून उत्तम प्रकारे विकासकामे होत असून उभी राहणारी विकास केंद्र (ग्रोथ सेंटर) ही राज्याकरिता अश्वशक्ती असल्याचे नमूद केले.

प्रास्ताविकात सिडकोचे एमडी विजय सिंघल यांनी उद्घाटन व भूमिपूजन होत असलेल्या प्रकल्पांचे सादरीकरण करून संक्षिप्त माहिती दिली.

या वेळी सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेला मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जोडणारा पूल, खारघर-तुर्भे जोडमार्ग आणि उलवे किनारी मार्ग या प्रकल्पांचे भूमिपूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे लोकनेते दि.बा. पाटील भूमिपुत्र भवन आणि प्रवासी जलवाहतूक टर्मिनस नेरूळ या नागरी हिताच्या प्रकल्पांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. लोकनेते दि.बा. पाटील भूमिपुत्र भवनाचे उद्घाटन केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने अटल सेतूसारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून मुंबई महानगर प्रदेशातील कनेक्टिव्हिटी समृद्ध करण्यावर भर दिला आहे. शासनाच्या या उद्दिष्टाला हातभार लावून सिडकोनेही परिवहनाचे विविध प्रकल्प हाती घेतले आहेत. खारघर-तुर्भे जोडमार्ग हा ५.४ किमी लांबीचा मार्ग असून या मार्गाद्वारे तुर्भे आणि खारघर येथील आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कदरम्यान थेट कनेक्टिव्हिटी निर्माण होणार आहे. उलवे किनारी मार्ग हा अटल सेतू (एमटीएचएल) आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना जोडणारा सहा पदरी मार्ग विकसित करण्यात येत आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गापासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास थेट जोडणाऱ्या या पुलामुळे पुणे व अन्य शहरांमधून येणाऱ्या वाहनांना थेट प्रवेश मार्ग उपलब्ध होणार आहे.

उलवे येथील लोकनेते दि.बा. पाटील भूमिपुत्र भवन हे नवी मुंबईतील स्थानिक भूमिपुत्रांना त्यांच्या संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ म्हणून विकसित करण्यात आले आहे. याचबरोबर या भवनाच्या माध्यमातून स्थानिकांना त्यांचे विविध सोहळे व कार्यक्रम साजरे करण्यासाठी हक्काची जागा प्राप्त होणार आहे. नेरूळ येथे प्रवासी जलवाहतूक टर्मिनस विकसित करण्यात आले असून येथून नवी मुंबई ते दक्षिण मुंबई आणि कोकण यादरम्यान रो-रो आणि स्पीड बोटसेवा लवकरच सुरू होणार आहे. याशिवाय नेरूळ, नवी मुंबई येथून मुंबई (भाऊचा धक्का) तसेच एलिफंटा गुंफा, मांडवा, रेवस इत्यादी ठिकाणी जलवाहतुकीची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे या प्रदेशांदरम्यान प्रवासाचे अंतर लक्षणीयरीत्या कमी होणार आहे तसेच पर्यटकांनाही या ठिकाणाला भेट देऊन रम्य सागरी प्रवासाचा आनंद लुटता येणार आहे.

## भाजप उत्तर रायगड जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक शुक्रवारी (दि.१५) पनवेल येथे आयोजित करण्यात आली होती. या वेळी पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पदाधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना देत मार्गदर्शन केले.

पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस कर्जतचे माजी आमदार सुरेश लाड, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड.प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, चिटणीस ब्रिजेश पटेल, उरण तालुकाध्यक्ष रवि भोईर, **(पान २ वर..)**









## विज्ञान आणि कौशल्याची कास धरा -सहसंचालक डॉ. विजय नारखेडे

### सीकेटी कॉलेजचा पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. अशा महाविद्यालयाचे विद्यार्थी म्हणवून घेणे हे त्यांच्यासाठी भाग्यवंताचे लक्षण आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिक्षणाबरोबर विज्ञान आणि कौशल्याची कास धरून प्रयत्नांची पराकाष्ठा करावी, असे आवाहन उच्च शिक्षण विभागाचे कोकण विभागीय सहसंचालक डॉ. विजय नारखेडे यांनी शुक्रवारी (दि.१५) केले. ते पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात बोलत होते. **(पान २ वर..)**

### महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करा -लोकनेते रामशेठ ठाकूर

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात यशस्वीतेबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक करून शिक्षणाचा वापर आपल्यासह समाजासाठी कसा होईल याचा विचार करीत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करा, असे नमूद केले तसेच भविष्यातील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



## धर्मादाय रुग्णालयाच्या जिल्हास्तरीय समितीवर आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांची नियुक्ती

**पनवेल** : धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याकरिता राज्य शासनाने समिती गठीत केली असून रायगड जिल्ह्याच्या समितीवर पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५०च्या कलम ४१ 'अ'मधील तरतुदी व त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिकेत दिलेल्या निर्णयानुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळण्याकरिता योजना केलेली आहे. त्यानुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या एकूण कार्यान्वित खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी आणि १० टक्के खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. **(पान २ वर..)**







# महाराष्ट्र पर्यावरणपूरक विकासकामे करणारे राज्य -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## नवी मुंबई मनपाच्या नागरी सुविधांचा शुभारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

महाराष्ट्र हे पर्यावरणपूरक विकासकामे करणारे राज्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई येथे केले. ते नवी मुंबई महापालिकेच्या विविध नागरी सुविधा, प्रकल्पांचा दूरदृश्य प्रणालीद्वारे ऑनलाईन भूमिपूजन, लोकार्पण समारंभाप्रसंगी बोलत होते.

ठाण्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, विधान परिषद सदस्य आमदार रमेश पाटील, झोपडपट्टी सुधार समितीचे सभापती विजय नाहटा, माजी खासदार संजीव नाईक, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.



या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, नुकताच नवी मुंबई आणि मुंबईला जोडणारा अटल सेतूचे लोकार्पण झाल्यामुळे दळणवळण सक्षम झाले. या प्रकल्पमध्ये फ्लेमिंगोसाठी विशेष व्यवस्था केली. नवी मुंबई हे सुनियोजित शहर म्हणून नावलौकिक आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दिलासा देणारे आहे. वर्षभरात या विमानतळाचे काम होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या विमानतळाचे उद्घाटन होईल, असा विश्वास शिंदे यांनी या वेळी व्यक्त केला. आयुक्त राजेश नार्वेकर यांनी, विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार एकूण सहा हजार कोटी रुपयांची विकासकामे सुरू असल्याचे सांगितले.

या लोकार्पण आणि भूमिपूजन झालेल्या प्रकल्प सुविधांमध्ये नियोजित छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा व ऐतिहासिक संग्रहालय, घणसोली-ऐरोली खाडीपूल बांधणे, नमुंमपा क्षेत्र सीसीटीव्ही यंत्रणा व नमुंमपा मुख्यालयातील कमांड सेंटर लोकार्पण, सीवूड्स नेरुळ येथील ज्येष्ठ नागरिक काळजी केंद्र इमारत लोकार्पण, अमृत योजना २.० अंतर्गत बेलापूर विभागातील मलउदंचन केंद्र बांधणे, पंपिंग मशिनरी बदलणे, शिरवणे येथे मलउदंचन केंद्र बांधणे, नेरुळ येथील मलउदंचन केंद्रामधील पंपिंग मशिनरी बदलणे, वाशी विभागातील मलउदंचन केंद्र बांधणे, सानपाडा मलउदंचन केंद्र बांधणे आणि पंपिंग मशिनरी बदलणे, कोपरखैरणे केंद्रामधील पंपिंग मशिनरी बदलणे, ऐरोली विभागातील यादव नगर येथे मलप्रक्रिया केंद्र बांधणे, बेलापूर विभागात सांडपाण्यावर पुनर्प्रक्रियेकरिता टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट बांधणे, बेलापूर विभागात पाणीपुरवठा यंत्रणा उभारणे, ज्वेल ऑफ नवी मुंबई नेरुळ येथील तलावाचे पुनरुज्जीवन करणे, कोपरखैरणे विभागात धारण तलावाचे पुनरुज्जीवन, भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र येथे फिल्टर बेड बांधणे कामाचा शुभारंभ, नमुंमपा क्षेत्रातील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे कामाचा शुभारंभ, से.३०, नेरूळ येथील शाळा इमारत लोकार्पण, से.१५, घणसोली येथील शाळा इमारत लोकार्पण, से.१४ कोपरखैरणे नागरी आरोग्य केंद्र इमारत लोकार्पण, से.३ ऐरोली येथील अग्निशमन केंद्र इमारत लोकार्पण, विष्णुदास भावे नाट्यगृह वाशी येथील ग्रंथालय लोकार्पण, से.२२ तुर्भे विभाग कार्यालय इमारत भूमिपूजन आणि नमुंमपा परिवहन उपक्रम, तुर्भे आगार प्रशासकीय इमारत लोकार्पण अशाप्रकारे एकूण ११२९ कोटी रक्कमेच्या सुविधा कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले.

# महाडच्या चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिनाची जय्यत तयारी

## कार्यक्रम दिमाखदार करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाचा ९७वा वर्धापन बुधवारी (दि.२०) महाड येथे साजरा होत आहे. यानिमित्ताने शासकीय मानवंदना देण्यात येणार आहे. सर्व शासकीय यंत्रणाच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी शुक्रवारी (दि.१५) जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत घेतला. चवदार तळ्याचे आंतरराष्ट्रीय महत्त्व लक्षात घेता कार्यक्रमाचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

या बैठकीस पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, समाज कल्याण सहायक आयुक्त सुनील जाधव, उपविभागीय अधिकारी महाड ज्ञानोबा बानापुरे, उपजिल्हाधिकारी श्रीकांत गायकवाड यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

नगर परिषदेमार्फत चवदार तळे, भीमनगर, क्रांती स्तंभ, स्मारक परिसराची साफसफाई करण्यात यावी तसेच शहरातील विविध ठिकाणी विद्युत रोषणाई व सुशोभिकरण करावे. तसेच क्रांती स्तंभ परिसरात ५० मोबाईल शौचालये, ३० स्नानगृहे उभारण्यात यावेत, तसेच महाड ग्रामीण रुग्णालयामार्फत रुग्णवाहिका तसेच पुरेसा औषधसाठा व आरोग्य पथक तैनात राहिल याची दक्षता घ्यावी. याबरोबरच अखंडित वीजपुरवठा तर अनुयायींची वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या काळात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही खबरदारी पोलीस यंत्रणेने घ्यावी. एसटी महामंडळाच्या वतीने १९ ते २१ मार्च या कालावधीत माणगाव, वीर, वामने व करंजाडी रेल्वेस्थानक ते महाड शहर अशी जादा बस व्यवस्था केली जाणार आहे. या नियोजनावर या वेळी चर्चा करण्यात आली, तसेच या ठिकाणी येणाऱ्या अनुयायांना पिण्याचे पाणी, सावलीसाठी मंडप तसेच संपूर्ण परिसरात दिशा दर्शक फलक लावण्यात यावेत. चौकात त्याची माहिती देणारी चित्रफित बनवावी अशा सूचनाही त्यांनी या वेळी दिल्या. अनुयायांना देण्यात येणाऱ्या अल्पोपाहाराचा दर्जा राखावा तसेच देण्यात येणाऱ्या फूड पॅकेटची तपासणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.



# खून करून पळालेल्या आरोपीस पनवेलमध्ये अटक

**पनवेल : प्रतिनिधी**

खून करून पळालेल्या आरोपीस पनवेल शहर पोलीस व भूम पोलीस यांनी संयुक्त कारवाई करून पनवेल येथून अटक केली आहे.



भूम पोलीस ठाणे हद्दीतील आरोपी सुरज लहू तोडकर (वय २०) याने त्याची पत्नी पूर्णिमा (वय १८ रा. पुणे) हिचा गळा दाबून खून केला होता व पुरावा नष्ट करण्यासाठी पेट्रोल टाकून तिचा मृतदेह जाळला. आरोपीने त्याच्या अल्पवयीन प्रेयसीने आत्महत्या केल्याचे भासविण्याकरीता सुसाईडनोट मृतदेहाजवळ टाकली होती. आरोपी सूरज तोडकर व इतर आरोपींविरुद्ध तिथे गुन्हा भूम पोलीस ठाण्यात दाखल केला होता. आरोपी सूरज लहू तोडकर हा पनवेल बसस्टँड परिसरामध्ये दुचाकीवरून येणार असल्याची माहिती भूम पोलिसांना मिळाली. त्यांनी पनवेल पोलिसांना दिली. प्राप्त माहितीच्या आधारे पनवेल शहर पोलीस अधिकारी व अंमलदारांचे खास पथक तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक तवार व पथक आरोपींचा शोध घेत होते.

आरोपी हा चिपळे गावात राहत असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली. त्याप्रमाणे आरोपीसाठी सापळा रचला असता, काही वेळात एकजण संशयितरित्या दुचाकीवर एका महिलेसह येताना दिसला. पोलिसांनी दुचाकीचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले असता हा सूरज तोडकर असल्याचे झाले.

त्याची अधिक चौकशी केली असता त्याने त्याची पत्नी पूर्णिमा हिचा विवाहबाह्य प्रेमसंबंधास विरोध असल्याने तिची हत्या केली. गुन्हा लपविण्यासाठी पनवेल येथे जेसीबीवर चालक म्हणून काम करून पनवेल परिसरात राहत होता, अशी माहिती त्याने दिली आहे. पनवेल पोलिसांनी आरोपीस भूम पोलिसांचे ताब्यात देण्यात आले.

# माजी नौदल प्रमुख ॲडमिरल एल. रामदास यांचे निधन



**रायगड** : देशाचे माजी नौदल प्रमुख ॲडमिरल एल. रामदास यांचे सिकंदराबाद येथे शुक्रवारी (दि.१५) निधन झाले. निधनासमयी ते ९० वर्षांचे होते. ते बऱ्याच दिवसांपासून आजारी होते. ॲडमिरल एल. रामदास डिसेंबर १९९० ते सप्टेंबर १९९३ दरम्यान देशाचे नौदल प्रमुख होते. एल. रामदास यांनी १९७१च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांनी मोठी भूमिका बजावली होती. ते पाकिस्तान-इंडिया पीपल्स फोरम फॉर पीस अँड डेमोक्रसीशी संबंधित होते. २००४मध्ये, त्यांना दक्षिण आशियाचे सैन्य नष्ट करण्यासाठी आणि आण्विक निःशस्त्रीकरण साध्य करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांसाठी शांततेच्या रॅमन मॅगसेसे पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या पश्चात पत्नी ललिता रामदास व तीन मुली आहेत.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-05/2024-25 Dtd.16.03.2024 RFX No.7000030902 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of MMV (e.g. Bolero Pickup, Tata Shakti Pickup, TATA 407, **Mahindra Bolero Camper** or similar Type) services along with fuel and driver at Line Maintenance Sub-Division Mahad Camp under Line Maintenance Sub-Division Mahad under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,98,944 /- (including GST)** |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-06/2024-25 Dtd.16.03.2024 RFX No.700030906 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of MMV (e.g. Bolero Pickup, Tata Shakti Pickup, TATA 407, Mahindra Bolero Camper or similar Type) services along with fuel and driver at Line Maintenance Sub-Division Kandalgaon Camp under Line Maintenance Sub-Division Mahad under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,98,944 /- (including GST)** |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-07/2024-25 Dtd.16.03.2024 RFX No.7000030908 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender hiring of LMV (e.g. Hyundai Xcent, Maruti Dzire, Maruti Brezza or similar Type) services along with fuel and driver at EHV (O&M) Dn.Mahad for the year 2024-25. | **Rs.5,83,582 /- (including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 16.03.2024 @ 00:00 hrs to 25.03.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

~Sd~

**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad.**


# पनवेलमध्ये दोन ठिकाणी लागलेल्या आगीत नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील आकुर्ली आणि कळंबोलीमध्ये आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत. या आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे, मात्र या आगीमुळे मोठे नुकसान झाले आहे.

पहिली घटना पनवेलमधील ग्रामीण भागात आकुर्ली फाटा येथे घडली. आकुर्ली फाटा येथील डोंगरावरच्या वृक्षांना तसेच कळंबोली वसाहतीमधील सिडको कार्यालयाशेजारील झोपड्यांना आग लागली. दोन्ही आगींवर अग्निशमन दलाने नियंत्रण मिळवले. आकुर्ली येथील डोंगराला लागलेल्या आगीच्या घटनेत हजारो वृक्ष होरपळले. उशीरापर्यंत डोंगरावरील आगीवर पाण्याचा मारा करुन आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम अग्निशमन दलाचे सुरू होते.

सायंकाळी कळंबोलीतील सिडको कार्यालयाशेजारील झोपड्यांना आग लागली. या आगीत शेकडो झोपड्या खाक झाल्या. काही मिनिटांत कळंबोली येथील अग्निशमन दलाच्या बंबाच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविले.

पान १ वरुन

## भाजप उत्तर रायगड जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक

कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, कर्जत विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेलच्या माजी महापौर डॉ.कविता चौतमोल, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## विज्ञान आणि कौशल्याची कास धरा -सहसंचालक डॉ. विजय नारखेडे

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त)मध्ये पदवी आणि पदव्युत्तर वर्षाच्या वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्याचे आयोजन संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.१५) करण्यात आले होते.त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उच्च शिक्षण विभागाचे कोकण विभागीय सहसंचालक डॉ. विजय नारखेडे बोलत होते. त्यांनी आपल्या भाषणात साहित्यिक पु.ल. देशपांडे यांनी सांगितलेल्या एका वाक्यावर भर देत उपजिवेकेसाठी शिक्षण घेऊन थांबू नका; तर साहित्य, खेळ, संगीत या क्षेत्रांमध्येसुद्धा आवड निर्माण करा, असे विद्यार्थ्यांना सूचित केले.

या सोहळ्यास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ.एस.टी. गडदे, भागुबाई चांगू काना ठाकूर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सानवी देशमुख, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, ॲड. विनायक कोळी आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील, विविध विद्याशाखांचे व विभागांचे प्रमुख मंचावर उपस्थित होते. एनसीसीच्या पथकाने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले.

प्राचार्य एस.के. पाटील यांनी महाविद्यालयातील गौरवशाली परंपरांचा आढावा घेतला. या सोहळ्यात पदवी तसेच विद्यावाचस्पतीप्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी परीक्षा नियंत्रक डॉ.एस.आय. उन्हाळे, विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाच्या अध्यक्ष डॉ.एम.ए. म्हात्रे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बी.डी. आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ.आर.व्ही. येवले, प्रा.ए.व्ही. पाटील व डॉ. गीतिका तंवर यांनी केले; तर डॉ. उन्हाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## धर्मादाय रुग्णालयाच्या जिल्हास्तरीय समितीवर आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांची नियुक्ती

त्या अनुषंगाने धर्मादाय रुग्णालयात निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित खाटा पारदर्शी पद्धतीने त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी विधी व न्याय विभागाच्या संदर्भाने शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाला सहाय्य करण्यासाठी राज्यात जिल्हास्तरीय समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने गठीत केलेल्या समितीच्या अनुषंगाने रायगड जिल्हास्तरीय समितीवर सदस्य म्हणून आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांची नियुक्ती करण्यात आली असून तसा शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे.


**पनवेल महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**जाहिर ई-निविदा सुचना**

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/१४१०/२०२४ | दिनांक:१५/०३/२०२४

**आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | PMC/CE/३६४/२०२२-२३ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम भूखंड क्र . ४१४ मध्ये प्ले ग्राउंड (खेळाचे मैदान) **केंद्र शासनाच्या 'भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य 2022-23'** या योजनेच्या अंतर्गत विकसीत करणे |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. १६/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ.प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# पनवेल खैरवाडी येथे जॅकवेलच्या कामाचे भूमिपूजन

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख तथा पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे मतदारसंघात अनेक विकासाची कामे सातत्याने सुरू आहेत. या अंतर्गत चिपळे ग्रामपंचायत हद्दीतील खैरवाडी येथे जलजीवन मिशन अंतर्गत जॅकवेलच्या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १४) करण्यात आले.

जलजीवन मिशन अंतर्गत जॅकवेलचे काम लवकरच सुरू होणार असून यामुळे येथील ग्रामस्थांची पाण्याची समस्या सुटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी आमदार प्रशांत ठाकूर व ग्रामपंचायतीचे आभार मानले.

या भूमिपूजन कार्यक्रमावेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, चिपळेचे माजी सरपंच रमेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य रूपेश फडके, युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, दुंदरे ग्रामपंचायतीचे उपसरपंच रमेश पाटील, तसेच गोटीराम फुलोरे, यांच्यासह खैरवाडी सरपंच, उपसरपंच, सदस्य, भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते. या योजनेचा लाभ कोप्रोली, विहिघर, बोनशेत, चिपळे व भोकरपाडा आदी ग्रामस्थांना होणार असल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# आसरे आदिवासीवाडी रस्त्याचे भूमिपूजन

## आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक निधीतून काम

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकासनिधीतून आसरे आदिवासीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी १० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१५) करण्यात आले.

ग्रुप ग्रामपंचायत आसरे सरपंच बळीराम जांभळे यांच्या सातत्यापूर्ण प्रयत्नाने आणि आमदार महेश बालदी यांच्या सहकार्याने त्यांच्या निधितून या कामाला मंजुरी मिळाली असून प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. रायगड जिल्हा उत्तर भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष सुधीर शेठ ठोंबरे यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी भाजपचे खालापूर तालुक्याचे अध्यक्ष प्रवीण मोरे, तुपगाव ग्रामपंचायतीचे सरपंच रवीद्र कुंभार, आसरे ग्रामपंचायतीचे सरपंच बळीराम जांभळे, राम डुकरे, तसेच भाजपचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.




# सीकेटी महाविद्यालयात आर्थिक साक्षरता आणि करिअरच्या संधीवर व्याख्यान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे बुधवारी (दि.१३) आर्थिक साक्षरता आणि त्यातील करिअरच्या संधी यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

सत्राला प्रमुख पाहुणे म्हणून नाबार्ड संलग्नित अर्थनिर्मिती या संस्थेचे आर्थिक सल्लागार प्रियांक जैन आणि नरेश चालवडी यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. विद्यार्थीदशेपासूनच केलेली बचत ही पुढील आयुष्यात कशाप्रकारे आपल्याला उपयोगी ठरते, याचे महत्त्व मुलांना त्यांनी पटवून दिले. सध्याच्या काळातील एसआयपी, म्युच्युअल फंड, इक्विटी मार्केट यांसारख्या क्षेत्रात कमीत कमी पैशांची गुंतवणूक करून त्याचा मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ कसा होतो हे उदाहरणांसह पटवून दिले.

सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. येवले यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे चेअरमन प्रा. डॉ. जितेंद्र पावरा आणि समन्वयक प्रा. विजयेंद्र शितोळे यांनी केले. बीएमएस विभागाचे प्रमुख प्रा. कुशल कुरानी, अर्थशास्त्र विभागाचे प्रा. हरिभाऊ थोरात, लेखा आणि वित्त विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. निलेश कोळी, इंटिरिअर डिझायनिंग विभागाच्या प्रा. प्रज्योती देसाई, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या लिपिक मनाली परब यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे व प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले.

# उरण तालुक्याचा शासनाच्या डोंगरी विकास योजनेत समावेश

## ■ आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याला यश

**उरण : रामप्रहर वत्त**

उरण तालुक्याचा शासनाच्या डोंगरी विकास योजनेत समावेश करण्यात आला असून आमदार महेश बालदी यांनी केलेल्या मागणी व पाठपुराव्याला यश आले आहे.

उरण विधानसभा मतदारसंघातील खालापूर व पनवेल तालुक्याचा समावेश डोंगरी विकास योजनेत समावेश आहे, पण उरण तालुक्याचा समावेश नसल्याने शासनाचा डोंगरी विकास योजनेचा निधी



खर्च करता येत नव्हता. त्यामुळे उरण तालुक्याचा डोंगरी विकास योजनेत समावेश करण्याची मागणी आणि पाठपुरावा आमदार महेश बालदी यांनी शासनदरबारी केला. त्या अनुषंगाने उरण तालुक्याचा समावेश करण्यात आला असून तसा शासन निर्णय जारी झाला आहे.

या निर्णयामुळे आता आवरे, जासई, कंठवली, दिघोडे, कोप्रोली, केगाव, बोरीनखाडी, चाणजे, म्हातवली, सारडे, रानसई, नागाव, चिर्ले, पुनाडे, कळंबुसरे, कडापे, चिरनेर, वेश्वी, पाले, घारापुरी इतर गावांचा समावेश डोंगरी विकास योजनेच्या उपगटात होणार आहे. या गावातील विकासकामांकरिता निधी मिळणार असल्याने ग्रामस्थांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानले आहेत.



**पनवेल : तक्का पेट्रोल पंपासमोर वंदे मातरम् टॅक्सी संघटनेच्या वार्षिक सत्यनारायण महापुजेनिमित्त गुरुवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी भाजप शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका नीता माळी, कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र घरत, वंदे मातरम् संघटनेचे अध्यक्ष रवी नाईक, मिनिडोर संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय पाटील, भाजप नेते गणेश पाटील, चंद्रकांत मंजुळे, विद्याधर जोशी, राजू पाटील, प्रफुल्ल पाटील, कमलाकर टाकले, जीवन टाकले, अभिजीत टाकले, भरत जुमलेदार, ग्रामपंचायत सदस्य शेखर कानडे, राजेंद्र पाटील, विनोद पवार, दीपक पाटील, विद्याधर मोकल, जितेंद्र पाटील, दिनेश पाटील, रोहन कदम, विश्वास कानडे, निलेश पाटील, धर्मराज मच्छिगर, नाकाप्रमुख उमेश पाटील, नाका अध्यक्ष दिलीप गावंड व सदस्य उपस्थित होते.**

# पनवेलमधील ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलचे उद्धव ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख शैलेश जगनाडे, शिव वाहतूक सेनेचे शहराध्यक्ष नितीन कसाबे यांनी वर्षा निवासस्थानी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भगवा ध्वज हाती देत स्वागत केले.

या वेळी मनसे वाहतूक सेनेचे जिल्हा संघटक विजय जाधव, उद्योजक चेतन देशमुख यांनीही शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या वेळी खासदार राहुल शेवाळे, आमदार प्रा. मनीषा कायंदे, उपनेते विजय नहाटा, शिवसेना सचिव कॅप्टन अभिजित अडसूळ, सुशांत शेलार, उपनेत्या कला शिंदे, विभागप्रमुख संध्या वढावकर, पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे उपस्थित होते.

# रस्त्यालगत पिस्तूल फेकून पलायन

**पनवेल : वार्ताहर**

स्कूटीवरून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी पनवेलमधील डी पॉईंटकडून उरणकडे जाणाऱ्या रस्त्यालगत गावठी पिस्तूल टाकून पलायन केल्याची घटना घडली आहे.

गस्तीवर असलेल्या पोलिसांना हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी ते पिस्तूल जप्त करून तिघांचा शोध सुरू केला आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार दिनेश दबडे हे सायंकाळी डी पॉईंटकडून उरणच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर गस्तीवर होते. त्या भागात एका स्कुटीवरून येत संशयास्पदरित्या आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी एक पिशवी रस्त्याच्या बाजूला फेकून पलायन केले.

# रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये बक्षीस वितरण



**खासघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील इ. सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पनवेल पं. स.च्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत यांच्या उपस्थितीत गुरुवारी (दि.१४) झाला.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या वतीने शैक्षणिक वर्षामध्ये विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धांध्ये विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. या स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, आरती नवघणे, रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका राज अलोनी उपस्थित होत्या.

# आयटीएफच्या शिष्टमंडळाची जेएनपीए बंदराला भेट

**उरण : रामप्रहर वृत्त**

इंटरनॅशनल ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडेरेशन (आयटीएफ) लंडन या बहुराष्ट्रीय संघाच्या भारतीय संलग्न संघटनांच्या प्रतिनिधिंसोबत दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी पॅट्रीक, एनरिको (लंडन) तसेच जेन्स व चेकर (स्विडन), राजेंद्र गिरी (दिल्ली)हे प्रतिनिधी उपस्थित होते.

न्यू मॅरिटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष तथा बहुराष्ट्रीय संघाच्या लॉजिस्टिक्स् सेक्टरचे व्हाईस चेअरमन कामगार नेते महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत परिषदेचे उद्घाटन झाले. परिषदेत देशभरातून १० संघटनांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. या परिषदेत जगभरातील कामगारांचे प्रश्न व समस्या यावर चर्चा झाली. शिष्टमंडळाने कामगार नेते महेंद्र घरत यांच्या नेतृत्वात जेएनपीए बंदराला भेट दिली. प्रबंधक मनीषा जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी ध्वनीचित्रफितीद्वारे कार्यप्रणालीची माहिती दिली व पाहुण्यांचे भेटवस्तू देऊन आदरातिथ्य केले. नंतर शिष्टमंडळाने जेएनपीएच्या कार्यप्रणालीची प्रत्यक्ष पाहणी केली.



# उन्हात फिरणे टाळा, भरपूर प्रमाणात पाणी प्या!

## पनवेल महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस अधिक वाढू लागली आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

येत्या काही दिवसांमध्ये तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान खात्याकडून दिल्याच्या पार्श्वभूमिवर नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे. दिवसेंदिवस उन्हाळ्याची तीव्रता अधिक वाढू लागल्याने भर दुपारी उन्हात जाणे नागरिकांनी शक्यतो टाळावे.

उन्हाच्या तडाख्यात बाहेरील कोल्ड्रिंक न घेता घरी बनवलेले ताक, दही, लिंबूपाणी, कैरीचे पन्हे, उसाचा रस, पुदिना सरबत नियमित घ्यावीत व भरपूर प्रमाणात पाणी प्यावे. उन्हाळ्यात सहज मिळणारी व पाण्याचे प्रमाण जास्त असणाऱ्या रसदार फळांचे सेवन करावे. उन्हामुळे तापमान वाढून शरीरातील पाण्याचे प्रमाण वारंवार कमी होत असते. दुपारी १२ ते ३ वा. दरम्यान उन्हात जाणे शक्यतो टाळावे.

रसदार फळांचे सेवन करावे. उन्हामुळे तापमान वाढून शरीरातील पाण्याचे प्रमाण वारंवार कमी होत असते. दुपारी उन्हात शेतीत कष्टाची कामे टाळावीत, असे उपाय सांगण्यात आले आहेत.

### हे पदार्थ खाणे टाळावे

– जंक फूड्स फॅट्सचे प्रमाण जास्त, पचायला कठीण यामुळे वजन वाढते.
– मांसाहार : पचनास जड असल्याने मांसाहार टाळावा.
– मसाल्याचे पदार्थ : उष्ण असल्याने मसाले अतिप्रमाणात वापरणे टाळावेत.
– कोल्ड्रिंक्स : शरीराला अपायकारक असल्याने सेवन कमी प्रमाणात करावे, तसेच चहा–कॉफीचेही प्रमाण कमी करावे.

### हे पदार्थ आहेत फायदेशीर

✻ कडुनिंबाची पाने किंवा लिंबाचा रस अंघोळीच्या पाण्यात टाकल्याने त्वचारोगापासून रक्षण होते. ✻ पुदिना चटणी, कैरीची चटणी, कढीपत्ता चटणी, कोशिंबीर, लोणचे असे तोंडी लावायचे पदार्थ जेवणात वापरावे.
✻ दैनंदिन आहारात कांदा, कैरी, टोमॅटो, काकडी आदींचा समावेश करावा.

### काय प्यावे?

पिण्याचे पाणी : दररोज कमीत कमी १२ ते १५ ग्लास पाणी प्यावे.
लिंबू पाणी : हे शरीरातील पाण्याची पातळी समांतर ठेवून नको असलेले घटक शरीराबाहेर टाकते.
ताक : ताक प्यायल्याने पोटातील आग आणि पित्त दूर होण्यास मदत होते.
कैरीचे पन्हे : थकवा जाणवत नाही. यामुळे आहारात याचा नियमित समावेश करावा.
नारळपाणी : उष्णता कमी होते, पोटातील आम्लाची पातळी कमी करण्यास मदत होते. दररोज प्यावे, असे उपाय सांगण्यात आले आहेत.



**नागरिकांनी उपाशीपोटी घराबाहेर पडू नये, तसेच सतत पाणी पिणे आवश्यक आहे. शक्यतो पूर्ण बाही असलेले सुती कपडे घातल्यास घामाचा परिणाम होत नाही. त्वचेला उष्णतेपासून वाचवण्यासाठी सनस्क्रीन, उन्हामध्ये चांगल्या दर्जाचा गॉगल वापरावा, टोपीचादेखील वापर करावा. दुपारी १२ ते ३ वा. दरम्यान घराबाहेर पडणे टाळावे.**
**–डॉ. आनंद गोसावी**
**मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल**

## संपादकीय

# येरे माझ्या मागल्या

'ईव्हीएम'विरोधातील याचिका शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. या वेळी न्यायमूर्ती संजीव खन्ना म्हणाले की, आम्ही किती वेळा ईव्हीएमविरोधी याचिकांचा विचार करायचा? प्रत्येक व्यवस्थेमध्ये गुणदोष असतात. निवडणूक यंत्रणेच्या बाबतीत निव्वळ गृहितकांवर किंवा संशयावर आधारित निर्णय घेणे अशक्य आहे, मात्र या निकालानंतरही विरोधकांचा ईव्हीएमविरोधातील सूर थंड होईल असे वाटत नाही.

**निवडणुका जवळ आल्या की ईव्हीएम अर्थात मतदानयंत्रांच्या कथित गडबडघोटाळ्याबद्दल चर्चांना उधाण येते, किंबहुना अशा चर्चांचे पेव फुटले की निवडणुका जवळ आल्या असे समजावे! २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कारकिर्द सुरू झाल्यानंतर देशातील विरोधकांचे धाबे दणाणले, कारण पंतप्रधान नरेंद्र मोदींची वाढती लोकप्रियता रोखण्यासाठी त्यांच्याकडे कुठले अस्त्रच उरले नाही. २०१९ साली आधीच्या पेक्षा अधिक जागा जिंकून प्रचंड मताधिक्याने मोदी सरकार पुन्हा सत्तेवर आले. आता यंदाच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने 'अब की बार चारसौ पार' अशी घोषणाच केली आहे. विरोधकांच्या जखमेवर हे मीठ चोळण्यासारखे आहे हे मान्य करावे लागेल, परंतु स्वत:वर अशी दयनीय वेळ का आली याचे आत्मपरीक्षण मोदी यांना विरोध करणाऱ्या प्रत्येक राजकीय पक्षाने करायला हवे. गेल्या दहा वर्षांत ईव्हीएमविरोधात विरोधकांनी इतक्या वेळा बोंबाबोंब ठोकली आहे की त्याला काही मर्यादाच उरलेली नाही. अनेक न्यायालयांपुढे ईव्हीएममधील कथित घोटाळ्यांसंदर्भात याचिका दाखल झाल्या. सर्वोच्च न्यायालयानेदेखील अनेक वेळा ईव्हीएमविरोधातील याचिकांचा गांभिर्याने विचार केला. खुद्द केंद्रीय निवडणूक आयोगाने कोणीही ईव्हीएम हॅक करून दाखवावे असे आव्हान देताना ईव्हीएम हॅकेथॉन नावाची स्पर्धाच घोषित केली होती. अर्थात, मतदान यंत्रे हॅक करून दाखवणारा कोणीही महाभाग पुढे आला नाही हा भाग वेगळा! ईव्हीएमच्या विरोधात पुण्यातील काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. काँग्रेसचे मध्य प्रदेशातील ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांनी तर ईव्हीएम बदनामीची आघाडीच उघडली आहे. कुणा एका नंदिनी शर्मा नावाच्या याचिकाकर्तीने ईव्हीएमविरोधात नुकतीच सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर सुनावणी घेताना सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शुक्रवारी उद्वेग प्रकट केला. अर्थात, नंदिनी शर्मा यांची याचिका फेटाळली गेलीच. ईव्हीएम यंत्रणा 'हॅक' करता येते असे अनेकांना वाटते, परंतु त्याला कुठलाही तांत्रिक अथवा शास्त्रीय आधार नाही. मतदान यंत्रामध्ये तांत्रिक हेराफेरी करणे काही प्रमाणात शक्य आहे असे घटकाभर गृहित धरले तरी तसे करताना निवडणूक यंत्रणेतील असंख्य कर्मचारी व अधिकारी तसेच सर्वपक्षीय कार्यकर्ते यांना विश्वासात घ्यावे लागेल. मतमोजणीच्या वेळी विरोधी पक्षांचे प्रतिनिधी हजर असतात आणि प्रत्येक वेळी त्यांची स्वाक्षरी घेतली जाते हे कुणीही विसरता कामा नये. ईव्हीएम यंत्रणेत कोणाच्याही नकळत फेरफार करता येणे केवळ अशक्य आहे. तसे घडले तर किती आरडाओरडा होईल याचा विचार केलेला बरा. विशेष म्हणजे ज्या काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते वारंवार ईव्हीएमबद्दल संशय व्यक्त करतात त्यांच्याच पक्षाच्या खासदारांनी संसदेत या प्रश्नावर गोंधळ का घातला नाही? ईव्हीएममधील हेराफेरी उघड करणारा एकही तज्ज्ञ मनुष्य गेल्या दहा वर्षांत त्यांना का सापडला नाही? या प्रश्नांची उत्तरे विरोधी पक्षांनीच द्यायला हवीत.**

# स्वच्छता, आरोग्य, पर्यावरणासाठी प्लास्टिक टाळा...!

वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, प्लास्टिकचा वाढता वापर यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. प्लास्टिकबंदीसाठी रायगड जिल्हा परिषदेमार्फत विविध माध्यमातून जनजागृती केली जात आहे, मात्र प्रत्येकाने प्लास्टिकचा वापर करणे स्वत:पासून टाळले तर स्वच्छ व हरित पर्यावरणासाठी प्रभावी काम होईल.



जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या प्रवासातील आपले जगणे प्लास्टिकने व्यापले आहे, मात्र प्लास्टिक हे मानवी आरोग्यासाठी घातक असल्याने त्याचा वापर टाळणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनामध्ये अन्न, पाणी आणि हवेमधून प्लास्टिकचे कण शरीरामध्ये प्रवेश करतात आणि ते मानवी पेशींसाठी घातक ठरतात. या प्लास्टिकमुळे मानवी शरीरातील पेशी मृत होऊन विविध आजार जडू शकतात असे २०१९मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या संशोधनात आढळून आले आहे. देशात रोज एक कोटी पाण्याच्या बाटल्या पाणी पिऊन फेकल्या जातात. प्लास्टिक वापर टाळणे व कापडी पिशवीचा वापर करून प्लास्टिक प्रदूषणाला प्रतिबंध करूया.

✻ प्लास्टिक पिशवी नकोच : प्लास्टिकच्या पदार्थामधून पाणी, अन्न घेणे टाळले तर मानवी शरीरात जाण्यास प्रतिबंद होऊ शकतो. विशेषता प्लास्टिक पॅकींगमधील फूड खाऊ नये. पोटात गेलेले प्लास्टिक शरीरावर गंभीर परिणाम करते.

✻ सिंगल युज प्लास्टिक धोकादायक : प्लास्टिक विघटनासाठी पाचशेहून अधिक वर्षे लागतात. सिंगल युज प्लास्टिक धोकादायक आहे ते इतरत्र व पाणवठ्यावर तसेच मोकळ्या जागेत टाकू नये.

✻ आरोग्याच्या समस्या : प्लास्टिक बाटल्यामधून पाणी पिणे टाळल्यास त्यातून शरीरात जाणारे सूक्ष्म कण टाळता येतील.

✻ कापडी पिशव्यांचा वापर : कापडी पिशव्यांचा वापर केल्यास प्लास्टिक पिशव्यांमुळे होणारे प्रदूषण कमी होईल.

✻ पर्यावरणाचे जतन : प्रदूषण कमी झाल्यामुळे माणूस आणि जनावरांच्या आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. पर्यावरणाचे जतन होईल.

✻ खर्च कमी : प्लास्टिक कचऱ्यावरील प्रक्रियेचा खर्च कमी होऊन हा निधी चांगल्या कामासाठी वापरता येईल.

✻ आजार टाळता येतील : प्लास्टिकवर प्रक्रिया करताना होणारे वायुप्रदूषण टाळून श्वसन तसेच फुफ्फुसाचे आजार टाळता येतील.

✻ गटारे तुंबणार नाहीत : गटारी, नाले तुंबल्यामुळे निर्माण होणारे आरोग्याचे तसेच विविध प्रश्न टाळता येतील.

✻ पुराचा धोका कमी : नाले व गटारी तुंबण्याचे प्रमाण कमी झाल्यास पुराचा धोका कमी होण्यास मदत होईल.

✻ पशुधन वाचवूया : जनावरे उघड्यावर चरताना त्यांच्या पोटात प्लास्टिक जाऊन आजारी पडतात काही जनावरे मृत्युमुखी पडतात.

✻ काळे प्लास्टिक धोकादायक : काळे प्लास्टिक तीव्र धोकादायक आहे ते वापरू नये.

✻ प्लास्टिक जाळणे धोक्याचे : प्लास्टिक जाळणे म्हणजे हवेच्या प्रदूषणातून श्वसनाचे आजार कर्करोगास निमंत्रण देण्यासारखे आहे.

**–सुरेश पाटील, माहिती शिक्षण संवादतज्ज्ञ (संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड)**

# संगीतकार भास्कर चंदावरकर

बहुआयामी व्यक्तिमत्त्व असणाऱ्या पं. भास्कर चंदावरकर यांचा जन्म १६ मार्च १९३६ रोजी पुणे येथे झाला. त्यांची मावशी सीता माविनकुर्वे (पं. विनायकबुवा पटवर्धन यांच्या शिष्या) या गायिका होत्या. तसेच बालवयापासून पुण्यातील सरदार आबासाहेब मुजुमदारांसारख्या संगीतप्रेमीच्या सहवासात आल्याने भास्कर चंदावरकरांच्या संगीतप्रेमास प्रोत्साहन मिळाले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण वाडिया महाविद्यालय व फर्गसन महाविद्यालय येथे झाले.

त्यांनी पं. रविशंकर आणि पं. उमाशंकर मिश्र यांच्याकडून सतारवादनाचे शिक्षण घेतले. त्यांनी पाश्चात्त्य संगीताचेही पद्धतशीर शिक्षण घेतले. त्यांनी १९६२–१९७८ आणि १९८५–८६ या काळात भारतात आणि युरोपियन देशांमध्ये आणि ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंडमध्ये सतारवादनाच्या अनेक मैफली केल्या.

फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिटट्यूट ऑफ इंडियामध्ये चंदावरकरांनी संगीताचे प्राध्यापक म्हणून १९६५ ते १९८० अशी चौदा वर्षे काम केले. तसेच अहमदाबादची नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ डिझाइन, पंजाब–हरियाणा विद्यापीठ, दिल्लीचे जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, बंगलोर येथील मॅनेजमेंट इन्स्टिटट्यूट या संस्थांमध्ये त्यांनी अतिथी प्राध्यापक म्हणूनही काम केले. अमेरिकेतही अनेक विद्यापीठांमध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, भारतीय संगीत शिकविणे अशा विविध प्रकारचे सांगीतिक कार्यही त्यांनी केले.

चंदावरकरांनी १९९२ ते १९९९ या काळात पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, जपान अशा विविध देशांत कलाविषयक संस्थांचे सल्लागार म्हणून काम केले. भारत आणि बांगलादेशाच्या सांस्कृतिक धोरण समितीचे सदस्य म्हणून त्यांनी या काळात काम केले. बांगलादेशात फोर्ड फाउण्डेशनचे सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांची १९८९ मध्ये दूरदर्शन व आकाशवाणीने मानद कार्यक्रम निष्पादक म्हणून नियुक्ती केली होती. राष्ट्रीय चित्रपट महोत्सव, अल्मा अटा (किरगिस्तान) येथील जागतिक जॅझ महोत्सव येथे




त्यांनी अनेक वेळा परीक्षक म्हणून काम पाहिले.


संगीतकार म्हणून चंदावरकरांची कारकीर्द विशेष लक्षणीय म्हणावी लागेल. मराठी, कन्नड, हिंदी आणि इंग्रजी या भाषांतील अनेक नाटकांना त्यांचे संगीत होते. त्यांनी १९७२ साली संगीत दिलेले 'घाशीराम कोतवाल' हे नाटक आणि त्यातील संगीताचा वापर यांचा ठसा मराठी रंगभूमीवर आजही आहे. 'तीन पैशांचा तमाशा', 'ये रे ये रे पावसा', 'आषाढ़ का एक दिन', 'गिरिबाला', 'रामनाम सत है', 'जेतेगिरी बेन चंदेरी' ही त्यांनी संगीत दिलेली काही प्रमुख नाटके होत. तसेच जर्मन भाषेतील 'नागमंडल', जपानी भाषेतील 'मीवा' या नाटकांनाही त्यांचे संगीत होते.

चंदावरकरांनी सुमारे चाळीस चित्रपटांना संगीत दिले. 'सामना' (१९७४), 'घाशीराम कोतवाल' (१९७६), 'सर्वसाक्षी', 'चांदोबा चांदोबा भागलास का' (१९७८), 'गारंबीचा बापू' (१९८०), 'आक्रित' (१९८१), 'एक डाव भुताचा' (१९८२), 'कैरी' (२००२), 'बयो', 'सरीवर सरी' (२००५), 'श्वास' (२००४), 'मातीमाय' (२००६) या मराठी चित्रपटांना, तसेच 'जय जवान जय किसान' (१९७१), 'माया दर्पन' (१९७२), 'जादू का शंख' (१९७४), 'अरविंद देसाई की अजीब दास्तान' (१९७८), 'अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यूं आता है' (१९८०), 'हमीदाबाई की कोठी', 'खंडहर' (१९८४), 'परोमा' (अपर्णा सेन कृत, १९८४), 'रावसाहेब' (विजया मेहता कृत, १९८६), 'थोड़ासा रूमानी हो जाए' (अमोल पालेकर कृत, १९९०) या हिंदी चित्रपटांना त्यांचे संगीत होते. 'वंशवृक्ष' (१९७१), 'कनक पुरंदर', 'तब्बलियू नीनदे मगने' (१९७७) या कन्नड, 'स्वप्नादनम' या मल्याळी, 'मायामिरिग' (१९८४) या उडिया आणि 'नाइन अवर्स टू रामा', 'अ लँप इन द निश' या इंग्रजी चित्रपटांना त्यांनी संगीत दिले होते. समांतर नाटक व चित्रपटांच्या चळवळींच्या संदर्भात भास्कर चंदावरकरांचे संगीत दिग्दर्शक म्हणून मोलाचे योगदान आहे.

चंदावरकर कित्येक प्रांगणीय आणि रंगमंचीय प्रस्तुतींचे संचालक होते. नक्षत्रांचे देणे हा काव्य–संगीताचा कार्यक्रम ही त्यांची शब्द–संगीताला दिलेली अनमोल देणगी आहे तसेच 'स्वप्नकोश' हा बॅले, 'प्रतिमा' नृत्यनाट्य, 'रंगविविधा', 'व्होल्गा ते गंगा' अशी अनेक रंगमंचीय प्रस्तुतीकरणे त्यांनी सादर केली. गणराज्य दिवस (१९८७), सुषिर वाद्य महोत्सव (दिल्ली), चित्रपट शताब्दी महोत्सव (मुंबई, १९९५) असे अनेक कार्यक्रम प्रांगणीय प्रस्तुती म्हणून त्यांनी सादर केले होते. त्यांना संगीत नाटक अकादमी पुरस्कार, चैत्र या मराठी लघुपटासाठी सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणून राष्ट्रीय चित्रपट सन्मान मिळाला. वयाच्या ७९व्या वर्षी पुणे येथे २५ जुलै २००९ रोजी त्यांचे निधन झाले. **– डॉ. शुभदा कुलकर्णी**




## व्हॉट्सॲपची चॅट हिस्ट्री ट्रान्सफर करणे झाले सोपे




व्हॉट्सॲपने आपल्या युजर्सना मोठा दिलासा दिला आहे. आतापर्यंत व्हॉट्सॲप चॅट ट्रान्सफर करणं हे एक मोठं काम होतं, पण आता युजर्स फक्त QR स्कॅन करून व्हॉट्सॲप चॅट्स ट्रान्सफर करू शकतील. यासाठी व्हॉट्सॲप युजर्सना क्लाउड बॅकअपची गरज नाही. युजर्स थेट वाय–फायवर चॅट हिस्ट्री ट्रान्सफर करण्यास सक्षम असतील. त्यासाठी वाय–फाय डायरेक्टची मदत घेतली जाणार आहे.

वाय–फाय डायरेक्ट फीचर दोन डिव्हाईसमध्ये सहज चॅट ट्रान्सफर करण्याची सुविधा देते. यासाठी दोन डिव्हाईस वाय–फायशी जोडावी लागतील. दोन्ही डिव्हाईस एकमेकांच्या जवळ ठेवावी लागतात. मग ते वाय–फायशी कनेक्ट करावे लागेल. यासोबतच लोकेशनही चालू करावे लागेल. यानंतर, ज्या स्मार्टफोनमधून व्हॉट्सॲप चॅट ट्रान्सफर करायचे आहे तो स्मार्टफोन चालू करा. फोनचं लॉक ओपन करा.

फोनमधील सेटिंग्ज ऑप्शनवर क्लिक करा. त्यानंतर व्हॉट्सॲप चॅट ट्रान्सफर पर्यायावर क्लिक करा. यापुढे QR कोड दिसेल. नवीन फोनवरून व्हॉट्सॲप चॅट हिस्ट्री स्कॅन करावी लागेल. नवीन फोनमध्ये व्हॉट्सॲप डाउनलोड करावे लागेल. यानंतर फोन नंबर रजिस्टर्ड करावा लागणार आहे.

क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर दुसरा फोन वाय–फाय डायरेक्टशी कनेक्ट करावा लागेल. व्हॉट्सॲप चॅट ट्रान्सफर करण्याची रिक्वेस्ट स्वीकारावी लागेल. त्यानंतर चॅट नवीन फोनवर ट्रान्सफर होईल. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे. व्हॉट्सॲप हे संवाद साधण्याचं प्रभावी माध्यम असून मोठ्या प्रमाणात त्याचा वापर केला जातो. व्हॉट्सॲपदेखील आपल्या युजर्ससाठी सातत्याने नवनवीन फीचर्स आणत असतं.

# आज राष्ट्रीय लसीकरण दिवस

रोगांपासून दूर ठेवण्यासाठी लसीकरण महत्वाचे आहे. राष्ट्रीय लसीकरण दिवस २०२३ जवळ येत आहे, चला तर मग आपण भारतातील या दिवसाचा इतिहास आणि महत्त्व पाहूया. दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जातो. सार्वजनिक आरोग्यामध्ये लसीकरणाचे महत्त्व सांगण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या दिवशी १९९५मध्ये भारतात पहिला तोंडावाटे पोलिओ लसीकरण डोस देण्यात आला. यापुढे दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय लसीकरण दिन म्हणून पाळला जातो.



निमित्त

संसर्गजन्य आजारांची वाढ रोखण्यासाठी लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. हे हस्तांतरणीय रोगांचे नियंत्रण आणि निर्मूलन करण्याचे साधन म्हणून काम करते. सामान्य लोकांचे आरोग्य सुधारणे आणि निरोगी राहणीमानाच्या दृष्टीने त्यांचे दर्जा उंचावणे हे महत्त्वाचे आहे. आपण आज या लेखामध्ये लसीकरणाच्या इतिहासापासून सुरू होणाऱ्या काही महत्त्वाच्या तपशीलांबद्दल पाहणार आहोत.

सराव म्हणून लसीकरणाचा शेकडो वर्षांपूर्वीचा इतिहास १७००च्या दशकात आहे. एडवर्ड जेनर, एक इंग्लिश चिकित्सक आणि शास्त्रज्ञ ही अशी व्यक्ती आहे ज्यांना लसींचे संस्थापक मानले जाते. १७९६मध्ये त्यांनी १३ वर्षांच्या मुलाचे लसीकरण करण्यासाठी काउपॉक्सविरुद्ध लस वापरली. त्यांनी चेचकविरुद्ध प्रतिकारशक्ती प्रस्थापित करण्यासाठीदेखील समर्थन केले आणि चेचकविरुद्ध पहिली लस १७९८मध्ये विकसित केली गेली.

१८व्या आणि १९व्या शतकात चेचकविरुद्ध मोठ्या प्रमाणात लसीकरण चालू राहिले आणि १९७९मध्ये मोठ्या प्रमाणात लसीकरणामुळे चेचकांचे उच्चाटन झाले. त्याचप्रमाणे लुई पाश्चर यांनी केलेल्या प्रयोगांमुळे १९व्या शतकात कॉलराविरूद्ध लसीकरण विकसित करण्यात मदत झाली. त्याचप्रमाणे नंतरच्या काळात वेगवेगळ्या इतर लसी विकसित केल्या गेल्या.

१९४०च्या दशकात, वैज्ञानिक ज्ञानाच्या आविष्कारांमुळे मोठ्या प्रमाणावर लसीचे उत्पादन झाले. १९६०च्या दरम्यान, गोवर, गालगुंड आणि रुबेलाविरुद्ध लस शोधण्यात आली, ज्याला चचठ लस म्हणून ओळखले जात असे. गेल्या काही वर्षांमध्ये, आणखी महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या ज्यामुळे लसींच्या जगात प्रगत लसी तंत्रज्ञानाचा समावेश करून मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. कोविड–१९ लसींचा नुकताच झालेला विकास आणि या रोगाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम हे लसीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय वाढीचे उदाहरण आहे.

१६ मार्च राष्ट्रीय लसीकरण दिनी, तुमचा जन्म झाला त्या दिवसापासून तुम्हाला आतापर्यंत मिळालेल्या सर्व लसी पाहण्यासाठी तुम्ही लसीकरणावरील तुमच्या नोंदी पाहू शकता. या लसींनी तुम्हाला जीवनातील अनेक घातक आजारांपासून वाचवले आहे. तथापि, कोणत्याही कारणास्तव तुम्ही चुकलेले कोणतेही लसीकरण असल्यास किंवा कोणत्याही आरोग्य स्थितीमुळे तुम्हाला लसीकरणाची आवश्यकता असल्यास, तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी भेटीची वेळ ठरवू शकता आणि दिवसाचा सर्वोत्तम प्रकारे साजरा करण्यासाठी डोस मिळवू शकता.

पुढे, तुम्ही लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि लसीकरणाच्या योग्य वापराबद्दल जागरूक करण्यासाठी सोशल मीडियावर संदेश पसरवू शकता.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**सुधागड : हापूस आंब्याचा मुख्य हंगाम सुरू होण्यास अजून कालावधी बाकी आहे, पण जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी बाजारात हापूस आंबे दाखल झाले आहेत, मात्र किंमत सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने हापूसची चव चाखण्यासाठी ग्राहकांना धीर धरावा लागेल.**

## आरोग्य प्रहर

# त्वचेचे आरोग्य जपणेही अतिशय महत्त्वाचे!

सौंदर्य टिकवून ठेवायचे असेल तर सातत्य राखणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामध्ये विविध ट्रीटमेंट असोत, सनस्क्रीन आणि मॉइश्चरायझर असो, यांच्या बरोबरीने निरोगी राहण्यासाठी योग्य आहार आणि विहार अतिशय महत्त्वाचे आहेत.

प्रत्येक रुग्ण डॉक्टरांना पथ्य–पाण्याबद्दल विचारतो. एक गोष्ट लक्षात ठेवा विशिष्ट पदार्थ भरपूर प्रमाणात खाल्ल्याने आपण लगेच तरुण दिसू शकत नाही, परंतु या पदार्थांचे नियमित सेवन वार्धक्यातदेखील छान दिसण्यात व छान वाटण्यात मदत करते.



ग्रीन टी, तेलकट मासे, डार्क चॉकलेट, विविध भाज्या, आळशीच्या बिया, सर्व प्रकारची फळे विशेषतः डाळिंब, केळी आणि लिंबूवर्गीय फळे, व्होकॅडो, ऑलिव्ह ऑइल हे काही महत्त्वाचे अन्नघटक आहेत.

ग्रीन टीचे काही अधिक फायदे आहेत. तो स्ट्राँग अँटीऑक्सिडंट आहे. ग्रीन टी रक्त पातळ करते, जे आपल्या हृदयासाठी फायदेशीर आहे, परंतु छोट्याशा शस्त्रक्रियेतसुद्धा जास्त रक्तस्त्राव करू शकते.

रावस, सुरमई आणि बांगडा यासारख्या तेलकट माशांमध्ये ओमेगा थ्री फॅटी सिड भरपूर प्रमाणात असतात. हे सिड त्वचेवरील तेलकट आवरण टिकवून ठेवते, ज्यायोगे त्वचा मुलायम राहते आणि सुरकुत्या कमी प्रमाणात तयार होतात. त्वचा शुष्क न झाल्यामुळे त्याच्यावर बारीक चिरा पडत नाहीत व ॲलर्जीचे प्रमाण आटोक्यात राहते. या माशांमधून प्रथिनांचा पुरवठा भरपूर होतो, ज्याच्या उपयोगाने त्वचेमध्ये कोलॅजेन आणि इलास्टिन या तंतूंची नवनिर्मिती होत राहते. हे दोन तंतू त्वचेला नितळ, लवचिक. मुलायम व गुबगुबीत करतात. माशांमध्ये सेलेनियम हे मूलद्रव्य भरपूर प्रमाणात असते. हे द्रव्य डीएनएच्या निर्मितीला आवश्यक असते, ज्यामुळे त्वचा पेशींना होणारी इजा रोखून नवीन पेशी निर्माण होतात.

सर्व प्रकारच्या भाज्यांमध्ये वेगवेगळी अँटीऑक्सिडेंट असतात. शिवाय त्यातील तंतूमय पदार्थ मोठ्या आतड्यातील लॅक्टोबॅसिलाय या चांगल्या जीवाणूंच्या वाढीला मदत करतात. हे जीवाणू त्वचेचे आरोग्य राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात.

संत्री, मोसंबी, लिंबे आणि पेरू ही फळे म्हणजे क जीवनसत्वाची कोठारेच आहेत. त्यांच्यामुळे अतिनील किरणांचा दुष्परिणाम रोखण्याबरोबरच त्वचेवरील पिगमेंटेशन कमी होण्यास मदत होते.

# पेण तालुक्यात चार कोटींच्या विकासकामांचे उद्घाटन, लोकार्पण

**पेण : प्रतिनिधी**

आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून पेण तालुक्यातील चार कोटींच्या विकासकामांचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात पेण विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष नरेंद्र ठाकूर व अध्यक्ष दयानंद भगत यांचे हस्ते करण्यात आले.



या वेळी कुरनाड अंतर्गत रस्ता, वाशी संरक्षक भिंत, सरेभाग अंतर्गत रस्ता, ओढांगी अंतर्गत रस्ता, घोडाबंदर अंतर्गत रस्ता, मोठे वढाव येथे साकव, वढाव लक्ष्मण महाराज साधन स्तंभ रस्ता, मोठे भाल अंतर्गत रस्ता, विठ्ठलवाडी येथे अंतर्गत रस्ता, ठाकूरबेडी अंतर्गत रस्ता, बेणेघाट अंतर्गत रस्ता, बोरी येथे समाज मंदिर सुशोभीकरण, ओढागी अंतर्गत रस्ता दिव स्मशानभूमी दुरूस्ती, जोहे अंतर्गत रस्ता, कोपर अंतर्गत रस्ता, हमरापूर सामाजिक सभागृह, हमरापूर व्यायामशाळा, सोनाखार अंतर्गत रस्ता, कळवे अंतर्गत रस्ता, दादर अंतर्गत रस्ता, वरेडी अंतर्गत रस्ता, पाटणोली नवघर अंतर्गत रस्ता, गागोदे बुद्रुक गणपती विसर्जन घाट, गागोदे खुर्द सामाजिक सभागृह, जिते अंतर्गत रस्ता, वलक येथे स्मशानभूमी सुशोभीकरण, बलवली येथे नाल्यावर साकव, खारपाडा घोटमालवाडी अंतर्गत रस्ता तयार करणे, बहिराम कोटक अंतर्गत अशा अनेक विकासकामांचा शुभारंभ झाला.

कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष उदय जवके, चिटणीस आत्माराम म्हात्रे, ओबीसी सेल उपाध्यक्ष यशवंत घासे, पेण युवक अध्यक्ष विकास पाटील, महिलाध्यक्ष चैताली पाटील, उपाध्यक्ष जयश्री पाटील, पेण विधानसभा सचिव प्रभाकर लांगी, तालुका उपाध्यक्ष महेंद्र वर्तक आदी उपस्थित होते.

# अलिबागमध्ये आयुष्मान भारत योजना नोंदणीकरण, कार्डवाटप

**अलिबाग** : केंद्र सरकारने नागरिकांसाठी लागू केलेली आयुष्मान भारत ही योजना जनतेसाठी लाभदायक आहे. पाच लक्ष रुपयांपर्यंतचे उपचार मोफत देणाऱ्या या योजनेमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे, अशी माहिती भाजपचे दक्षिण रायगड उपाध्यक्ष आणि प्रदेश आयुष्मान भारत सेलचे सहसंयोजक दिलीप भोईर यांनी दिली.



नवखार, चोरोंडे, दिवीपारंगी, वैजाळी येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रत्येक गावात हे शिबिर आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**ई-निविदा सुचना**

पनवेल महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये रोबोटिक लॅब सुरु करणेसाठी एजन्सीची नियुक्ती बाबत या कामाची निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्या येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

पमपा/शिक्षण/निविदा/०२/२०२४
दिनांक : १५/०३/२०२४

**सही/-**
**(गणेश शेटे )**
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका



**उरण नगरपरिषद, उरण**

जा.क्र. उनप/भांडार/३२७३/२०२३-२४
उरण नगरपरिषद, उरण
दिनांक :- १५/०३/२०२४

**जाहीर ई-निविदा सूचना-सन २०२४**

उरण नगरपरिषद, उरण. जि.रायगड. यांजकडुन खालील कामासाठी/नोंदणीकृत/अनुभवी ठेकेदार/पुरवठादार कडुन फेर ई-निविदा पध्दतीने निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | इसारा रक्कम | फॉर्म फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषदेस शिवजयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महापरिनिर्वाण दिन, नवरात्रौत्सव, गणेशोत्सव, व इतर शासकीय कार्यक्रमा साठी लागणारे मंडप व इतर साहित्य भाडेतत्वावर पुरविणे कामी ठेकेदार नियुक्त करणेबाबत. | रुपये १०,०००/- | रुपये २०००/- | कार्यादेश दिले पासून १ वर्षे |

**निविदा सादरीकरण तपशिल.**

| अ.क्र. | तपशिल | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिध्द दिनांक | १६/०३/२०२४ दुपारी १.०० | |
| २ | ई-निविदा प्रपत्र डाउनलोड करावयाच दिनांक | १६/०३/२०२४ दुपारी १.०० | २५/०३/२०२४ संध्या. ५.०० |
| ३ | ई-निविदा प्रपत्र दाखल करावयाच दिनांक | १६/०३/२०२४ दुपारी १.०० | २५/०३/२०२४ संध्या. ५.०० |
| ४ | ई-निविदा प्रि-बीड मिटींग दिनांक | १९/०३/२०२४ दुपारी १.०० | |
| ५ | ई-निविदा प्रपत्र तपासणी करावयाच दिनांक | २७/०३/२०२४ दुपारी १.०० | |
| ६ | ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक २७/०३/२०२४ अथवा नगरपरिषदेच्या प्रशासकीय सोईनुसार. | |

सदरची संपुर्ण ई-निविदा प्रकिया ऑनलाइन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा नोटीस, प्रसिध्दी सुचना आवश्यक कागदपत्र इत्यादीची माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १६/०३/२०२४ पासुन उपलब्ध होईल.

सदर ई-निविदा प्रकियेसाठी आवश्यक असणारे DSC टोकन हे निविदाधारक यांनी प्राधिकृत संस्थेकडुन काढुन घ्यावेत व सदर DSC टोकनचा वापर करुन http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सदर कामाची निविदा अपलोड करावी.निविदा संबंधी माहिती व अटी शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
उरण नगरपरिषद, उरण,


# दांडफाटा येथे रिक्षा अपघातात चारजण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील दांडफाटा रसायनी येथे रिक्षाचालकाचे (एमएच ४६ बिपी ४४९४) अतिवेगात नियंत्रण सुटल्याने रिक्षा पलटी झाली. यामध्ये चारजण जखमी झाले. हा अपघात टाकेदेवी मंदिर दांडफाटाजवळ शुक्रवारी (दि.१५) सकाळी ११ वा. सुमारास घडला.

जखमींना एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे दाखल करण्यात आले आहे. अपघातातील चार जखमी एकाच कुटुंबातील आहेत. या रिक्षातून प्रवास करणारी दीड वर्षाची मुलगी होती. सुदैवाने तिला काहीही इजा झाली नाही.

# बोरघाटात स्कोडा कार जळून खाक

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गाने पुणे येथे जाणाऱ्या स्कोडा कारने (एमएच १३ एजे ८२७१) बोरघाटातील शिंग्रोबा मंदिराजवळ एचओसी ब्रिजखाली आली असता अचानक पेट घेतला. ही घटना शुक्रवारी (दि.१५) सायंकाळी ६.१५ वा. सुमारास घडली.

आग लागल्याचे चालकाच्या लक्षात येताच त्याने बाहेर उडी मारली व सुरक्षितस्थळी पोहचल्यावर बोरघाट पोलीस अग्निशमन दलास पाचारण केले. अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल होईपर्यंत संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती. या घटनेने अर्धा तास वाहतूक थांबविण्यात आली होती.



# ट्रक कठड्यावर आदळून उलटला

**म्हसळा : प्रतिनिधी**

घोणसे घाटात सिमेंट घेऊन पनवेलकडून भरधाव वेगात येणारा ट्रक संरक्षक कठड्याला आदळल्याने रस्त्याच्या कडेला उलटला. यामुळे चालक किरकोळ जखमी झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेलकडून म्हसळ्याकडे जाणारा सिमेंट ट्रक (एमएच ०८ एफ २४२०) हा ट्रक येत असता घोणसे घाटातील केळेवाडी परिसरात तीव्र उतार आणि शिघ्र वळणावर चालकाचे भरधाव गाडीवरील नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. अपघातात ट्रकचे नुकसान झाले. अपघाताचा अधिक तपास पोलीस नाईक विघ्ने, सपोनि पवन चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**शुद्धीपत्रक**

**ई निविदा सूचना क्र. १२८/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक १२/०१/२०२४ रोजी दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई, दैनिक कृषिवल, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या उपरोक्त ई निविदा सूचनेतील कामांकरीता शुद्धीपत्रक देण्यात येत आहे.

वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाची अंदाजित किंमतीत बदल करण्यात येत आहे. तसेच वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पेण अलिबाग पाणी पुरवठा योजना.... पोयनाड जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात नविन १२० दलली प्रतिदिन क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्र तसेच अनुषंगिक इमारती व बांधकाम करणे व नागोठणे येथील उदंचन केंद्राचे विस्तारीकरण करणे. | ₹ १६६,७५,०८,८२०.०० एवजी ₹ ०.०० अशी वाचावी |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/०३/२०२४ ते ०१/०४/२०२४ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २१/०३/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २६/०३/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक १६३/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्र.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्रमांक पी-३२ भागाला विविध पायाभूत सुविधा पुरवणे | ₹२२,३२,१८,६७५.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/०३/२०२४ ते दिनांक ०१/०४/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २०/०३/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २२/०३/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. १५५/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक ०७/०३/२०२४ रोजी दैनिक सामना, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | नागोठाणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... नागोठाणेपाणीपुरवठा योजनेची १३०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी अशुद्ध जलवाहिनी साखळी क्र. १००० मीटर जवळ जमिनीखाली घेणे. | ₹ ३९,५३,२८३.०० |
| २. | नागोठणे औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. मेसर्स आयपीसीएल नागोठणेसाठी टाकलेल्या १३०० मिमी व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीची वार्षिक तत्वावर दैनंदिन देखभाल करणे. | ₹ २८,७५,३६७.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-11/24-25/ Rfx No. 7000030659 | AMC for various types of 220 kV & 400 kV bay maintenance work of under 400kV RS (O&M) Div., Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel for FY. 2024-25 | Rs. 24.16 | 21.03.2024 up to 23.59hrs |

**EMD Rs.** 1% of Estimate cost & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-03/2024-25 Dtd.15.03.2024 RFX No. 7000030837 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at Line Maintenance Sub- Division Mahad under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,83,582/- (including GST)** |
| 2. | **Tender No:-** EE/EHV(O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-04/2024-25 Dtd.15.03.2024 RFX No.7000030845 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at Substation Maintains Sub-Division Mahad for the Year 2024-25. | **Rs.5,83,582/- (including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs. 5836/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 15.03.2024 @ 00:00 hrs to 21.03.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**~Sd~**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad.**



ॲड. आशा अरुणकुमार भगत
मो. ८१०८३५५०००

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ.अर्ज क्र.: १०५/२०२४
नि.८/ड
ने.ता. १९/०४/२४

श्री. अजित कृष्णा पवार
वय ४० वर्षे धंदा-नोकरी
राहणार डी / १०३ यश राज कॉम्प्लेक्स, प्लॉट १, सेक्टर १६ कामोठे ...................... **अर्जदार**
तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२१८.

सदरहु अर्जदार यांचे वडिल **कै.कृष्णा मालजी पवार** हे दिनांक १०/०५/२०१७ रोजी मिलेनियम हॉस्पीटल, कामोठे मयत झाले आहेत. **कै. कृष्णा मालजी पवार** यांची पत्नी **कै. अनिता कृष्णा पवार** ही दिनांक ०७/०८/२०२३ कामोठे येथे मयत झाली आहे व **कै. कृष्णा मालजी पवार** यांची आई **कै. विठाबाई मालजी पवार** ही दिनांक ही दिनांक १०/०२/१९९९ मुंबई येथे मयत झाली आहे

**कै. कृष्णा मालजी पवार** यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. कृष्णा मालजी पवार यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे :-

कै. विठाबाई मालजी पवार (मयत मुळ पुरुषाची मयत आई)
↓
कै. कृष्णा मालजी पवार (मयत मुळ पुरुष) कै. अनिता कृष्णा पवार (मयत मुळ पुरुषाची पत्नी)
↓
श्री. अजित कृष्णा पवार (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)

१. सदरहु कै. कृष्णा मालजी पवार यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनीकेचे वर्णन येणेप्रमाणे :-

**१) मौजे कामोठे तालुका पनवेल येथिल सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंट क्र. | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| यशराज कॉम्प्लेक्स सदनिका क्रमांक डी / १०३ | १ | १६ | ६,५०,०००/- |

**सदर मिळकतीस चतु:सिमा खालिलप्रमाणे आहेत :**

**१)** पुर्वेस १५ मीटरचा रस्ता **२)** पश्चिमेस भुखंड क्रमांक १३अ **३)** उत्तरेस : भुखंड क्रमांक ९ **४)** दक्षिणेस २ मीटरचा रस्ता

२. सदरहू सदनिका कै. कृष्णा मालजी पवार यांनी मे. यशराज कॉर्पोरेशन यांचे कडुन विकत घेतलेली होती. कै. कृष्णा मालजी पवार हे दिनांक ०५/०६/२००७ च्या खरेदी खताने दुय्यम निबंधक पनवेल यांचे कडे या सदनिकेचे पवल क्रमांक ४५३५/२००७ अन्वये मालक झालेले होते.

३. परंतु सदरची व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे मिळकत आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. कृष्णा मालजी पवार यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर सदनिका हस्तातरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत सबब सदर अर्जास कारण घडले आहे.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज १५/०३/२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**सही /-**
**व. लिपीक दि.न्या.व.स्तर पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही /-**
**सह. अधिक्षक दि.न्या.व. स्तर पनवेल**

# यंदापासून इंग्रजी माध्यम शाळा सुरू कराव्या

## आमदार गणेश नाईक यांची महापालिका प्रशासनाला सूचना

**नवी मुंबई : बातमीदार**

येत्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच जून २०२४पासून नर्सरी ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याची सूचना आमदार गणेश नाईक यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. शासकीय अनुदानाची वाट पाहू नका. त्यावर शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडूस्कर यांनी कार्यवाही सुरू केल्याची माहिती दिली.

नवी मुंबई महापालिकेत झालेल्या बैठकीत आमदार गणेश नाईक यांनी सूचना केल्या. राईट टू एज्युकेशन धोरणांतर्गत विविध खासगी शाळांमधून विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. या अंतर्गत आठवीपर्यंत शासकीय अनुदान मिळते, परंतु आठवी ते दहावीपर्यंत शासन अनुदान मिळत नाही. आठवी ते दहावीपर्यंतचा शैक्षणिक शुल्काचा भार महापालिकेने शिष्यवृत्तीच्या स्वरूपात उचलावा, अशी मागणी जिल्हाध्यक्ष नाईक यांनी केली. स्वयंसहाय्यता धोरणांतर्गत पालिकेला इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करता येतील, असे मत माजी महापौर सुधाकर सोनवणे यांनी या वेळी मांडले.



**पाणीटंचाईवर प्रभावी उपाय योजना करा**

शिरवणे, बोनसरी सारख्या शहरातील अन्य भागात आजही पाणीटंचाई कायम आहे. प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी आमदार नाईक यांनी केली. त्यावर शहर अभियंता संजय देसाई यांनी अतिरिक्त जलवाहिन्या टाकून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येईल असे सांगितले. त्याचबरोबर एमआयडीसीचा शटडाऊन आठवड्यातून एकच वेळा घेण्यात येणार आहे, अशी माहितीदेखील त्यांनी दिली. भिरा पाणीयोजनेला गती देण्याचे आमदार नाईक यांनी सूचित केले.

**प्रदूषणाला आळा घाला**

शहरामध्ये खैरणे, बोनकोडे कोपरी, महापे, तुर्भे, पावणे व अन्य ठिकाणी रात्रीच्या वेळेस होणारे प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासोबत बैठक घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची सूचना आमदार नाईक यांनी केली.

**नागरी सुविधा भूखंड ताब्यात ठेवा**

भविष्यात नवी मुंबईकरांना विविध प्रकारच्या नागरी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नागरी सुविधा भूखंडाची आवश्यकता भासणार असून एमआयडीसीकडून महापालिकेला मिळालेले आणि सिडकोकडील सुविधा भूखंड पालिकेने ताब्यात ठेवावेत, अन्यथा भविष्यामध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी भूखंड उरणार नाहीत, असे डॉ. संजीव नाईक म्हणाले.

## निवडक



### खारपाटील शाळेच्या मुख्याध्यापकांचा गौरव

**उरण** : नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लोकनेते दि. बा. पाटील चळवळ स्पर्धेत चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यम स्कूल व परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालय तसेच काळुशेठ धाकू खारपाटील ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यांचा सन्मान म्हणून प्राचार्य सुरदास राऊत आणि मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे यांना गौरविण्यात आले. हा कार्यक्रम चिरनेर शाळेत प्राचार्य सुरदास राऊत, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. लोकनेते दि. बा. पाटील चळवळ स्पर्धा हा अनोखा उपक्रम दशरथ भगत, लोकनेते दिबांचे सुपुत्र अतुल पाटील, स्पर्धा व प्रवक्ता शैलेश घाग यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आला होता.

### अत्रे कट्ट्यावर उद्या 'हास्यचिंतन'

**पनवेल** : नवीन पनवेलमधील अत्रे कट्ट्यावर रविवारी (दि. १७) सायं. ५.३० वाजता महाराष्ट्र सेवा संघाचे माजी अध्यक्ष, कवी आणि वक्ते चंद्रशेखर वझे हे हास्यचिंतन हा कार्यक्रम सादर करणार आहेत. यात ते सर्वसामान्यांच्या जीवनात हरघडी येणाऱ्या अडचणी, समस्या यांच्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून कसे पाहता येईल हे विनोदाच्या अंगाने सांगणार आहेत. हा कार्यक्रम नवीन पनवेलमधील अरुणोदय क्लिनिकसमोरील सिडको गार्डनमध्ये होणार असून तो सर्वांसाठी खुला आहे.

### रोबोटद्वारे गुडघ्याच्या १०० शस्त्रक्रिया

**पनवेल** : शहरातील सुप्रसिद्ध पटेल हॉस्पिटलमध्ये रोबोटद्वारे गुडघ्याच्या १०० शस्त्रक्रिया पार पडल्या आहेत. डॉ. कुणाल मखिजा यांनी रोबोटिकनी रिप्लेसमेंटच्या यशस्वी शस्त्रक्रिया पार पडल्या असून त्यांनी आत्तापर्यंत ३०००हून अधिक गुडघ्याच्या शस्त्रक्रिया केल्या असल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली.

### योग केंद्रातर्फे रक्तदान शिबिर

**पनवेल** : इन्स्टिट्यूट ऑफ योग अँड आयुर्वेद व आरोग्य सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणाऱ्या पनवेलमधील योग केंद्रातर्फे संस्थापक पु. ल. भारद्वाज यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गेली २० वर्षे सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. श्रीसाई रक्त केंद्र यांच्या सहयोगाने आरोग्य मंदिर, टिळक रोड, पनवेल येथे नुकत्याच पार पडलेल्या या रक्तदान शिबिरात ११४ जणांनी नावनोंदणी केली आणि ९१ जणांनी प्रत्यक्ष रक्तदान केले. शिबिराच्या उद्घाटक वैद्या अंकिता प्रणय तांडेल यांनी रक्तदानाचा इतिहास, माहिती व आवश्यकता समजावून सांगितली. विशेष म्हणजे या वेळी पनवेलमधील अशोक खरे यांनी ६०वे व प्रशांत काळण यांनी ५१वे रक्तदान केले. योग केंद्राचे सचिव सतीश देशमुख यांनीही आजवर ५० वेळा रक्तदान केले आहे.

# प्रकल्पांची वेगवान अंमलबजावणी करा

## सिडको उपाध्यक्ष सिंघल यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी गुरुवारी (दि.१४) सिडको गृहनिर्माण साईट्स तथा उत्कृष्टता केंद्र, गोल्फ कोर्स आणि अन्य प्रकल्प स्थळांना भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी सिडकोच्या या प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने व्हावी याकरिता संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल, डॉ. कैलास शिंदे, दिलीप ढोले, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, मुख्य नियोजनकार (नवी मुंबई) रवींद्र मानकर, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) शीला करुणाकरन, अतिरिक्त मुख्य अभियंता प्रभाकर फुलारी, जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी मानसरोवर गृहनिर्माण प्रकल्प, नावडे व तळोजा गृहनिर्माण प्रकल्प, सेंटर ऑफ एक्सलन्स, सेंट्रल पार्क, खारघर तुर्भे बोगदा जोड मार्ग, खारघर गोल्फ कोर्स आणि खारघर गृहनिर्माण प्रकल्प या प्रकल्प स्थळांना भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी प्रकल्पाच्या सद्यस्थितीविषयी चर्चा केली व प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने व्हावी याकरिता निर्देश दिले.

नवी मुंबईला जागतिक दर्जाची क्रीडा नगरी बनवण्यासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स फुटबॉल स्टेडियम व खारघर व्हॅली गोल्फ कोर्सचा १८ होल्समध्ये विस्तार, या प्रकल्पांना गती देणे आवश्यक आहे. खारघर-तुर्भे बोगदा जोड मार्ग हा प्रकल्प परिवहन व कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. या व अन्य प्रकल्प स्थळांना भेट देऊन प्रकल्पांची अंमलबजावणी वेगाने व नियोजित वेळेत व्हावी याकरिता संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले.

# बीसीटी विधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी हर्षदा चव्हाणचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय, भिवंडी यांनी नुकत्याच आयोजित केलेल्या विधीरत या राज्यस्तरीय संशोधन पेपर स्पर्धेत भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रगल्भ प्रतिभा आणि शैक्षणिक पराक्रमाचे प्रदर्शन केले. प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख व बीएलएस एलएलबी समन्वयक, सहाय्यक प्राध्यापक धनश्री योगेश कदम आणि संशोधन विभागाचे प्रमुख डॉ. क्रांती भोवते यांच्या मार्गदर्शनाखली हर्षदा चव्हाण हिने हे यश मिळवले.

एलएलएमच्या द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी हर्षदा चव्हाण हिने बीसीटी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले आणि स्पर्धेत द्वितीय पारितोषिक मिळवले.

महाविद्यालयाच्या मार्गदर्शनाखाली काळजीपूर्वक तयार केलेला तिचा शोधनिबंध, कायदा, तंत्रज्ञान आणि मुत्सद्देगिरीचा छेदनबिंदू शोधून काढला, ज्याने समकालीन कायदेशीर समस्यांबद्दल अंतर्दृष्टी दिली. हर्षदाच्या या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

# हैदराबाद मुक्ती दिन १७ सप्टेंबरला होणार साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तीसंग्राम समिती आणि मराठवाडा हितकारणी संघ, मुंबई महानगर प्रदेशातील पदाधिकाऱ्याची संयुक्त बैठक गुरुवारी सुप्पारक भवन सेक्टर १९, खारघर येथील सभागृहात डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सरकारच्या हैदराबाद मुक्ती दिन आदेशाचे मराठवाडा मुक्तीसंग्राम स्मारक समितीकडून अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**मराठवाडा मुक्तीसंग्राम समितीकडून स्वागत**

गेली अनेक वर्षांपासून मराठवाडा मुक्तीसंग्राम स्मारक समितीच्या वतीने हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन देशभर साजरा करावा यासाठी सरकारकडे मागणी, आंदोलन करण्यात येत होते. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन देशभर साजरा व्हावा या मागणीला गृहमंत्रालय भारत सरकारने मान्यता दिली. १७ सप्टेंबर हा दिवस देशभर हैदराबाद मुक्ती दिन म्हणून साजरा होणार आहे याबद्दल बैठकीत आंनद व्यक्त करण्यात आला.

या वेळी नवी मुंबई सिडको क्षेत्रात मराठवाडा मुक्ती स्मारकासाठी सरकारने भुखंड द्यावा या मागणीसाठी सरकारकडे मागणी करण्याचे बैठकीत ठरले, असे या संघटनेच्या वतीने डॉ. जी. के. डोंगरगावकर, अनिल रामराव मुळे, किशोर शिंदे-पाटील, भगवान कांबळे, ॲड. हर्षल शाक्य यांनी जाहीर केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान हैदराबाद मुक्तीसंग्रामात असुन आजसुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशानुसार हैदराबाद मुक्तीसंग्राम लढ्यात सहभागी असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांचे प्रकरण प्रलंबित असून महाराष्ट्र सरकाने याकडे विशेष लक्ष घालावे यासाठी महाराष्ट्राचे गृहमंत्री तथा उपमुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत संघटनेच्या वतीने वेळोवेळी निवेदन देण्यात आले आहे.

# वासांबे ग्रामपंचायतीतर्फे स्वच्छता मोहीम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जिल्ह्यात स्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून यात सार्वजनिक ठिकाणाच्या स्वच्छतेस प्राधान्य देण्यात येत आहे. यासाठी सार्वजनिक परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी १४ मार्च २०२४ रोजी वासांबे ग्रामपंचायतीतर्फे वासांबे-मोहोपाडा परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



यात गावातील उकिरडे, कचरा साठणारी ठिकाणे, डंपिंग ग्राउंड आदी ठिकाणी वासांबे ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छ करण्यात आली. या वेळी ग्रामपंचायतीच्या वतीने ठिकठिकाणाच्या कचऱ्याचे व्यवस्थापन व्हावे, याकरिता वासांबे पंचायतीने कचरा वेळेत उचलला जाईल याचे नियोजन केले, तसेच स्वच्छता कायम राहिल यासाठी सफाई कामगारांची नियुक्ती केली व प्लास्टिक कचरा स्वतंत्रपणे एकत्रित करून तसेच घनकचऱ्याचे खतामध्ये रूपांतर होईल यासाठी काळजी घेतली तसेच दर गुरूवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या वेळी वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे, ग्रामविकास अधिकारी विनोद चांदोरकर, ग्रामपंचायत सदस्य आकाश जुईकर, दीपक कांबळे, रसिका खराडे, वेदिका पाटील, प्रतिक्षा राऊत, मयुरा गोपाळे, प्रशाली खाने, कविता मांडे, सौ.पाटील, ताई पवार, वनिता पारंगे यांच्यासह स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

# गोसावेवाडीच्या सरपंचपदी भाजपच्या अस्मिता गोसावी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या पनवेल शहर अनुसूचित जाती जमाती महिलाध्यक्ष अस्मिता गोसावी यांची कराड उत्तरेतील गोसावेवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी निवड झाली आहे. सरपंचपदासह सहा जागांवर भाजपने विजय मिळवला आहे, तर राष्ट्रवादीचे दोन उमेदवार विजयी झाले आहेत.

भाजपच्या अनिता जाधव, सुनीता मोहिते, मारुती मदने, पवित्रा शिंदे, संतोष शिंदे हे चार उमेदवार विजयी झाले. त्यांच्या या निवडीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल मनपा माजी सभागृह नेते परेश ठाकूर ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, माजी महिला तालुकाध्यक्ष रत्नाप्रभा घरत, माजी उपमहापौर चारूशिला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# आदर्श प्रतिष्ठानचा वर्धापन दिन, पुरस्कार सोहळा उत्साहात

**ठाणे** : आदर्श प्रतिष्ठानचा वर्धापन दिन, पुरस्कार सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृह ठाणे येथे मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला.



वैश्य ग्लोबल बिजनेस ग्रुप, सॅटर्डे क्लब, वैश्यवाणी समाज, ट्रेनर्स असोसिएशन आणि आदर्श प्रतिष्ठानचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते, लेखक, प्रा. अशोक चिटणीस, सॅटर्डे क्लबचे मॅनेजिंग ट्रस्टी अशोकराव दुगाडे, यशस्वी उद्योजक दीपक मेजारी, बेडेकर मॅनेजमेंट कॉलेजचे संचालक नितीन जोशी, वैश्य सहकारी बँकेचे संचालक प्रदीप गांगण, ॲड. विलास गांगण, कोकणस्थ वैश्य समाजाचे भाई शेट्ये, जागृती गांगण, मेघना थरवळ, रचना व अमित बागवे, दीपक शिंदे, आरती बनसोडे, नितीन बोरसे, संजय सावंत सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी उद्योगभूषण या पुरस्काराने मनोज आंग्रे, संतोष दलाल, गणेश महाडेश्वर, संजय भाट आणि सामाजिक संस्थांचा सन्मान करण्यात आला.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात दोन दिवसीय करिअर मार्गदर्शन सत्र





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज व शास्त्र महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभागाने १४ व १५ मार्चदरम्यान दोन दिवसीय करिअर मार्गदर्शन सत्र झाले.

करिअर मार्गदर्शनासाठी माय पोस्ट ग्लॅड नेरूळ या संस्थेचे संस्थापक शिरीष यादव यांनी उपस्थित राहून सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना रिझ्युम बिल्डिंग, स्पोकन इंग्लिश, प्रोफाइल क्रिएशन, सर्व सॉफ्ट तसेच करिअरविषयी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील सर्व शाखेतील सुमारे १५० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या दोन दिवशीय करिअर सत्राचा लाभ घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या सत्राचा लाभ घेण्यासाठी सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीनी प्रोत्साहन दिले व शुभेच्छा दिल्या.

दोन दिवस सत्राचे आयोजन विभाग प्रमुख माहिती व तंत्रज्ञान विभाग व कॉम्प्युटर सायन्स प्रा. स्नेहा लोखंडे यांनी केले तसेच, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. श्रद्धा करवा, प्रा. राणी शेख यांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

या सत्राचे सूत्रसंचालन प्रा. नीलम मोरे यांनी केले व प्रा. महेश धायगुडे यांनी सर्वांचे आभार मानले.





**पनवेल : भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी वीर सावरकर चौक येथील रामेश्वर महादेव मंदिरात दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. या वेळी भाजप सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.**

# चवदार तळे सुशोभिकरणासह विविध विकासकामांसाठी २६.५० कोटी मंजूर

**महाड : प्रतिनिधी**

महाड येथील चवदार तळे सुशोभिकरणासाठी सात कोटी रुपये, राजर्षी शाहू महाराज मंदिर सभागृहासाठी तीन कोटी रुपये मतदारसंघातील जवळपास विविध रस्त्यांसाठी दोन कोटी रुपये तसेच अल्पसंख्याक विभागाकडून प्रामुख्याने मुस्लिम समाजाच्या विकासासाठी २.५ कोटी रुपये आणि प्रादेशिक पर्यटनाच्या माध्यमातून १२ कोटी रुपये असे एकूण २६.५० कोटी रुपये नव्याने विविध विकासकामांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत मंजूर करून आणले असल्याची माहिती आमदार गोगावले यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्याचप्रमाणे मतदारसंघातील



बौद्धवाड्यांवरील रखडलेल्या सर्व बौद्ध विहारांची कामेदेखील मार्गी लावणार असल्याचे त्यांनी या निमित्ताने सांगितले.

नुकतेच शासनाने स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथे शिवसृष्टीला मान्यता दिली असून त्यासाठी ५० कोटी रुपयेदेखील मंजूर केले आहेत. याच शिवशृष्टीच्या धर्तीवर महाड येथे भीमसृष्टी उभारण्याचा आपला विचार असल्याचे आमदार गोगावले यांनी सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची क्रांतिभूमी असलेल्या चवदार तळे येथे भीमसृष्टी व्हावी अशी मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित असून आजही लाखो भीमसैनिकांसह बाबासाहेबांच्या विचारांवर प्रेम करणाऱ्या तमाम जनतेचीही मागणी आहे आणि त्या दृष्टीनेच निवडणुकीनंतर त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

प्रादेशिक पर्यटनाच्या माध्यमातून मंजूर केलेल्या १२ कोटींपैकी सर्वांत जास्त निधी हा पोलादपूर तालुक्यातील कुडपण येथे देण्यात येणार असून या ठिकाणी पर्यटन विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगत तेथील भिमाची काठी व त्यामधील दरीसमोरील पृष्ठभागावर छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदारसंघातील जनता ही कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षाच्या विचारांची असून या सर्वांना विकासकामांसाठी एकत्रित आणण्याचे काम यानिमित्ताने आपण केले आहे आणि भविष्यात आपल्या मतदारसंघातील सर्व समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत या विकासाचा लाभ पोहचवण्याचे आपले ध्येय असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेच्या शेवटी सांगितले.

या पत्रकार परिषदेला आमदार गोगावले यांच्यासमवेत आरपीआयचे मोहन खांबे व अन्य पदाधिकारी, शिवसेना महाड शहरप्रमुख डॉ.चेतन सुर्वे, महिला आघाडी प्रमुख विद्या देसाई, माजी नगरसेवक सुनील अगरवाल, दीपक सावंत, सिद्धेश पाटेकर, राजू देशमुख, राजू पावले आदी उपस्थित होते.

## नोंदीची कामे मार्गी न लावणाऱ्या मंडळ अधिकाऱ्यांवर कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

खरेदीखत नोंदीच्या कामात विलंब करणाऱ्या जिल्ह्यातील १४ मंडळ अधिकाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाने दणका दिला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी संदीप शिर्के यांनी ही कारवाई केली. अलिबाग मुख्यालयात त्यांची बदली करण्यात आली असून त्यांच्यावर तहसील कार्यालयातील अन्य कामाचा भार सोपविण्यात आला आहे.

रायगड जिल्हा वारस नोंदीमध्ये कोकणामध्ये अव्वल ठरला आहे. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत जिल्ह्यात वारस नोंदी, खरेदीखत नोंदी अशा अनेक प्रकारची कामे मोठ्या प्रमाणात केली जातात. तलाठ्यांसह मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयात हा प्रस्ताव गेल्यावर दोन महिन्यांपासून सहा महिने नोंदीसाठी वाट पाहावी लागत आहे. मंडळ अधिकाऱ्यांकडून वेळेवर नोंदी होत नसल्याचे लक्षात आले. निवासी उपजिल्हाधिकारी यांनी याबाबत कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ३० दिवसांच्या आत नोंदीची कामे मार्गी न लावणाऱ्या जिल्ह्यातील १४ मंडळ अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा सुरू केला आहे. जासई, म्हसळा, पोयंजे, कर्जत, पेण ग्रामीण, नागाव, कोप्रोली, वाळवंटी, खामगाव, मांघरुण, वाकण, कामार्ली, मोर्बे व मुरूड येथील मंडळ अधिकाऱ्यांचा समावेश असून या सर्वांच्या बदल्या अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालय अभिलेख कक्षात एक आठवड्यासाठी करण्यात आल्या आहेत.

# पोलादपूर नगरपंचायतीतर्फे विकासकामांचा शुभारंभ

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरपंचायतीतर्फे पाच कोटींपेक्षा अधिक निधीच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन विविध प्रभागांमध्ये करण्यात आले.

शिवसेना संपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, नगराध्यक्ष सोनल गायकवाड व उपनगराध्यक्ष नागेश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत २९ विकासकामांच्या भूमिपूजनाचे नारळ फोडण्यात आले. पोलादपूर पोलीस ठाण्याजवळ सीसीटीव्ही आणि एलईडीच्या भूमिपूजनप्रसंगी पोलादपूर पोलीस निरिक्षक अनिल जाधव उपस्थित होते.




सहाय्य योजनेंतर्गत नगरपंचायत क्षेत्रामध्ये विद्युत पोल आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. या वेळी तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, संपर्क कार्यालय प्रमुख तळेकर, अनिल दळवी, उपनगराध्यक्ष नागेश पवार, सभापती प्रसाद इंगवले, सुनीता पार्टे, अंकिता जांभळेकर निकम, अस्मिता पवार, नगरसेवक विनायक दिक्षित, मनोज प्रजापती, सुरेश पवार, शिल्पा दरेकर, स्नेहा मेहता आदी उपस्थित होते.

सह्याद्रीनगर, सैनिकनगर, जाखमतानगर, प्रभातनगर, हनुमाननगर, सावंतकोंड, पार्टेकोंड, शंकर मंदिर, शिवाजीनगर तसेच प्रभाग क्रमांक १४ येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे पिरकोन, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री कमळ्या अर्जुन गावंड व इतर यांच्या मालकीची आहे.

| मालकाचे नाव | मौजे | गट क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १. कमळ्या अर्जुन गावंड<br>२. राधाबाई गणपत म्हात्रे<br>३. गोदावरी अर्जुन गावंड<br>४. परशुराम अर्जुन गावंड<br>५. सोमुबाई रामा गावंड<br>६. रमेश रामा गावंड<br>७. आनंता रामा गावंड<br>८. पुष्पा हरिश जोशी<br>९. नामुबाई काशिनाथ गावंड<br>१०. पाडूरंग काशिनाथ गावंड<br>११. महेंद्र काशिनाथ गावंड<br>१२. बेबी काशिनाथ गावंड<br>१३. मनिषा काशिनाथ गावंड | पिरकोन | २१६/२ /क | ०-१७-९०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकूण ०-१९-७० | २.०६ |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा / लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०३/२०२४

**सही/-**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**ॲडव्होकेट,**

९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी
उरण, ता. उरण. फोननं. ८८७९१४१२३२

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे पिरकोन, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत पांडूरंग बाबूराव पाटील व इतर यांच्या मालकीची आहे.

| मालकाचे नाव | मौजे | गट क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १. पांडूरंग बाबुराव पाटिल<br>२. रामचंद्र बाबुराव पाटिल<br>३. वत्सला दयानंद पाटिल<br>४. वत्सला दयानंद म्हात्रे<br>५. अर्जुन रामदास पाटिल<br>६. काशिनाथ लडग्या पाटिल<br>७. कौशल्या बाबुराव पाटिल<br>८. गजानन लडग्या पाटिल<br>९. गुंफा कमळाकर पाटिल<br>१०. जयश्री हरिश्चंद्र गावंड<br>११. जामिबाई लडग्या पाटिल<br>१२. नामदेव सोमा पाटिल<br>१३. पदुबाई हिराचंद म्हात्रे उर्फ पाटिल<br>१४. गणपत काळा पाटिल<br>१५. जानकीबाई गुरूनाथ पाटिल<br>१६. प्रकाश गुरूनाथ पाटिल<br>१७. वनिता अनिल पाटिल<br>१८. उज्वला प्रशांत गावंड | पिरकोन | २१८/२ अ | ०-३१-९०<br>पो.ख.०-०२-१०<br>एकूण ०-३४-०० | ३-५० |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा / लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०३/२०२४

**सही/-**
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**ॲडव्होकेट,**

९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी
उरण, ता. उरण. फोननं. ८८७९१४१२३२




**कर्जत : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल आणि भाजप कर्जत तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने बोरगाव शाळेत विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश भगत, स्थानिक बुथ अध्यक्ष यशवंत डोंगरे, वैभव भगत, उमरोली पं. स. विभाग अध्यक्ष रामदास तुपे, शरद श्रीखंडे, तालुका सरचिटणीस संदीप म्हसकर, चिंचवली बीएलए राजेश नाईक, ललित धस, महेश डोंगरे, रवी पाटील, रोशन पाटील आदी उपस्थित होते. याबद्दल बोरगाव शाळेचे मुख्याध्यापक शंकर ठाकूर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले.**

# वाकण नाका येथील बसथांब्याचे उद्घाटन



**नागोठणे : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणेजवळील वाकण नाका येथील बसथांब्याचे उद्घाटन गुरुवारी (दि.१४) आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते झाले. त्यामुळे प्रवाशांना सुविधा मिळाली आहे.

वाकण बसथांबा १९८९च्या महापुरात पूर्णपणे उद्ध्वस्त झाला होता. त्यानंतर आजतागायत दुर्लक्षित असल्याने प्रवासीवर्ग त्रासला होता. रोहा पंचायत समितीचे माजी सभापती सदानंद गायकर व पाटणसई सरपंच माधवी गायकर यांनी वाकण बसथांब्यासाठी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर त्यांच्या सहकार्याने मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या विशेष प्रयत्नाने जिल्हा परिषदेचा सेस फंड आणि जनसुविधा अंतर्गत वाकण बसथांब्यासाठी सहा लाख रुपये मंजूर झाले होते.

बसथांबा उद्घाटन समारंभास राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, सदानंद गायकर, सरपंच माधवी गायकर, डॉ. राजेंद्र धात्रक, मधुकर ठमके, संतोष कोळी, सचिन कळसकर, प्रमोद जांबेकर, उपसरपंच सुरेश गायकर, माजी उपसरपंच पांडुरंग गायकर, तुकाराम राणे, कृष्णा मिनमिने, ऐनघर माजी उपसरपंच यशवंत हलदे, पाटणसई माजी सरपंच झिमाशेठ कोकरे, सुरेश शिनगारे, वणी उपसरपंच महेंद्र हंबीर, हेमंत गायकर, प्रतिक गायकर, मदन गायकर, काशिराम कोतवाल, राजू जोशी, छबीलदास कोतवाल, संतोष राणे, दीपक महाडिक, विजया कोतवाल, ऐश्वर्या कोतवाल, यामिनी कोतवाल, मिना धरवडा, ठेकेदार प्रकाश पाटील आदींसह कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. बसथांब्यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०६**

जा.क्र/पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२३९/२३९/२०२४

## स्वारस्य अभिव्यक्ती

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एनयुएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३ मंत्रालय मुंबई-४०००३२, तारीख: २८ ऑगस्ट, २०१४, तसेच केंद्र शासनाच्या नागरी बेघर निवारा मार्गदर्शक सुचना अन्वये महानगरपालिकेत बेघर निवारा केंद्र असणे आवश्यक आहे. पनवेल महानगरपालिकेने मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ८७४ दिनांक २२/०२/२०२४ नुसार उपलब्ध केलेल्या जागेवर नागरी बेघर निवारा केंद्र चालविण्याबाबत स्वारस्य अभिव्यक्ती मागविण्यात येत आहे. सदर स्वारस्य अभिव्यक्तीमध्ये पनवेल महानगरपालिका जागा उपलब्ध करुन देणार आहे. याव्यतिरीक्त बेघर निवारा केंद्राचा संपुर्ण खर्च संबंधित संस्थेने करावयाचा आहे याची नोंद घ्यावी. सदर जागेचे स्वरुप तसेच स्वारस्य अभिव्यक्ती मधील अटी व शर्ती या दिनांक २७/३/२०२४, दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या NULM विभागामध्ये उपलब्ध होतील याची नोंद घ्यावी.

दिनांक : १५/०३/२०२४

**सही/-**
**(डॉ वैभव विधाते)**
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

## शुद्धीपत्रक

दिनांक १५/०३/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिर सूचना क्र. जा.क्र./ SUH २३२३/प्र.क्र.०२/३६१/२०२४ दिनांक : १४/०३/२०२४ काही तांत्रिक कारणास्तव रद्द करण्यात येत आहे याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ वैभव विधाते)**
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १६५/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | तळोजा औद्योगिक क्षेत्र... तळोजा औद्योगिक क्षेत्रातीलट्रक टर्मिनस५ वर्षांच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर परिचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी वाटप करणे. **(दुसरी मागणी)** | ₹ 0.00 |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १५/०३/२०२४ ते दिनांक २२/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १८/०३/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १९/०३/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

**ई निविदा सूचना क्र. १२८/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक २९/०१/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे , मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक एक्टिव टाईम्स, मुंबई, दैनिक प्रातःकाल,मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पेण अलिबाग पाणी पुरवठा योजना.... पाणी पुरवठयासाठी पोयनाड येथे नविन जलशुध्दी करण केंद्रामध्ये नागोठणे उदंचन केंद्रापासुन पोयनाड जलशुध्दी करण केंद्रापर्यंत नविन १५०० मीमी व्याउसाची मृदूपोलादी जलवाहिनी टाकणे. | ₹ १८९,७०,३५,३२६.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २१/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# पनवेल महानगरपालिका

आजच आपला

# मालमत्ता कर

भरा व शहराच्या

# विकासासाठी

सहकार्य करा...

एकूण **५६७** कोटी रु. मालमत्ता कर जमा



या वर्षी **२८०** कोटी रु. मालमत्ता कर जमा

मा. मुंबई उच्च न्यायालयाने मालमत्ता कर वसूलीला कोणतीही स्थगिती दिलेली नाही.
**त्यामुळे अफवांवर विश्वास ठेवू नये.**

**मालमत्ता कर न भरल्यास**

- मालमत्ता हस्तांतरणावर वर बंदी
- मालमत्ता कराचा बोजा चढविणार
- स्थावर व जंगम मालमत्ता अटकावून ठेवणार

कोणतीही कर माफी होणार नाही. करदांत्यानो कृपया देयकाप्रमाणे आजच आपला कर भरावा!!!

- कोणत्याही प्राधिकरणाने मालमत्ता कराबाबत कोणतीही कर सवलत/सूट दिली, तर ती सर्वांना आपोआपच लागू होईल. ज्यांनी कर भरलेला असेल, त्यांची ती रक्कम भविष्यातील त्यांचे देयकापोटी समायोजित होईल. मग २% प्रतिमाह शास्तीचा भुर्दंड स्वीकारायचा कशाला ???

ऑनलाईन पद्धतीने कर भरण्यासाठी

PMC TAX WEBSITE

अधिक माहितीसाठी या टोल फ्री क्रमांकावर, सकाळी १० ते सायं ६ वाजेपर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) संपर्क करा

**1800 5320 340**

PMC Tax App

GET IT ON Google Play

www.panvelmc.org




जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र.२३०/२३०/२०२४. दिनांक : १५/०३/२०२४